सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानमंडळाच्या माजी सदस्यांना अनुज्ञेय असलेले निवृत्तिवेतन आणि अन्य सोयी-सुविधा यासंबंधीचे अधिनियम आणि नियम अंतर्भूत असलेली पुस्तिका



महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
नोव्हेंबर २००९

# महाराष्ट्र विधानमंडळाच्या माजी सदस्यांना अनुज्ञेय असलेले निवृत्तिवेतन आणि अन्य सोयी-सुविधा यासंबंधीचे अधिनियम आणि नियम अंतर्भूत असलेली पुस्तिका

एचबी १९३५-१

# प्रस्तावना

राज्य विधीमंडळ सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या सोयी-सुविधांची माहिती अंतर्भूत असलेली पुस्तिका यापूर्वी विधानमंडळ सचिवालयाकडून प्रकाशित करण्यात आलेली होती. यामध्ये माजी सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या सोयी-सुविधांचा देखील समावेश करण्यात आलेला होता. परंतु केवळ माजी सदस्यांच्या सोयी-सुविधांची माहिती अंतर्भूत असलेली स्वतंत्र पुस्तिका जुलै, २००८ मध्ये प्रकाशित करण्यात आली होती. १२ व्या विधानसभेचे औचित्य साधून अशी पुस्तिका नव्याने प्रकाशित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या माजी सदस्यांना अनुज्ञेय असलेले निवृत्तिवेतन, विनामुल्य रेल्वे प्रवास सुविधा तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या गाड्यातून विनामूल्य प्रवास सुविधा यासंदर्भातील अधिनियम, नियम व शासन निर्णयांचे संकलन करून अद्ययावत माहिती देण्याचा या पुस्तिकेद्वारे प्रयत्न आहे.

विद्यमान व माजी विधानमंडळ सदस्यांना सारख्याच वैद्यकीय सुविधा लागू करण्यात आल्या आहेत. त्याबाबत स्वतंत्र पुस्तिका प्रकाशित करण्यात येत आहे. रेल्वे प्रवास सुविधेसंदर्भात शासनाने निर्गमित केलेले निर्णय व आदेश यांच्या संकलनामुळे सदर पुस्तिकेतील माहिती माजी सदस्यांना निश्चितच उपयुक्त होईल अशी आशा व्यक्त करतो.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक नोव्हेंबर २००९.

**अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.



एचबी १९३५-१ अ

# अनुक्रमणिका


| अनु-क्रमांक (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन, १९७६ . . | १ |
| २ | महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन नियम, १९७७ . . | ११ |
| ३ | जोडपत्र . . | १९ |
| ४ | माजी विधानमंडळ सदस्यांना विनामूल्य रेल्वे प्रवासाची सुविधा. . . | ४७ |
| ५ | माजी विधानमंडळ सदस्यांना त्याचे विवाहसाथी अथवा एका सहकाऱ्यासह महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या गाड्यांतून प्रवास करण्याची सवलत. . . | ६२ |

## दृष्टिक्षेप

## माजी विधानमंडळ सदस्यांना मिळणारे निवृत्तिवेतन व कुटुंबवेतनासंदर्भात संक्षिप्त माहिती (१ जुलै, २००९ रोजी प्रमाणे)

**(१) निवृत्तिवेतन**

(अ) राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य म्हणून निवडून आलेल्या अथवा नामनिर्देशित झालेल्या व्यक्तीने ज्यांनी '' सदस्य '' म्हणून शपथ घेतली आहे अथवा घेतल्यास, अशा व्यक्तीस, दरमहा रुपये पंधरा हजार निवृत्तिवेतन देण्यात येईल.

(ब) ज्यावेळी एखाद्या व्यक्तीने पाच वर्षापेक्षा जास्त मुदतीसाठी सदस्य म्हणून सेवा केली असेल, त्याच्या पाच वर्षांवरील प्रत्येक वर्षासाठी दरमहा एक हजार रुपये या प्रमाणात जादा निवृत्तिवेतन देण्यात येईल.

**(२) कुटुंब वेतन**

(अ) मृत्यू पावलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या माजी सदस्याच्या विधवेस किंवा विधुरास अशा माजी सदस्याच्या मृत्यूच्या दिनांकाला देय असणाऱ्या दरमहा निवृत्तिवेतनाच्या रकमेच्या ५० टक्के किंवा दरमहा रु. ७,५०० या दोहों-पैकी जी अधिक असेल ती रक्कम कुटुंब वेतन म्हणून लागू असेल.

(ब) मृत सदस्याच्या विधवेच्या किंवा विधुराच्या मृत्यूच्या पश्चात त्या सदस्याचे अज्ञान अपत्य किंवा अपत्ये हयात असतील तर, अशा अज्ञान अपत्याला किंवा अपत्यांना, विधवा किंवा विधुर यांना ज्याप्रमाणे निवृत्तिवेतन देय होते, त्याप्रमाणे दरमहा निवृत्तिवेतन लागू असेल.

**(३) रेल्वे प्रवास**

प्रतिवर्षी राज्यात व राज्याबाहेर एकत्रितपणे एकूण ३५,००० कि.मी. इतक्या मर्यादेपर्यंत सोबत्यासह विनामूल्य रेल्वे प्रवास (प्रथमवर्ग किंवा वातानूकूलीन द्वितीय शयनयान) सवलत अनुज्ञेय आहे. त्याकरिता प्रथम प्रवास करून त्याची प्रतिपूर्ती तीन महिन्यात घेणे आवश्यक आहे. उपरोक्त देयके राज्यात व राज्याबाहेर रेल्वे ऐवजी विमानाने प्रवास केल्यास रेल्वेच्या भाड्याइतकी (प्रथमवर्ग किंवा वातानुकूलीत द्वितीय शयनयान) प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे.

# महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६

# सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १

# महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ**.—(१) या अधिनियमास महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ असे म्ह ,ता येईल.

(२) तो राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अंमलात येईल.

२. **व्याख्या**.—संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसल्यास या अधिनियमात,—

(१) " राज्य विधानमंडळ सदस्य " म्हणजे महाराष्ट्र विधानसभेचा सदस्य किंवा महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य आणि त्यात पुढील सदस्यांचा समावेश होईल :—

(अ) मुंबई विधानसभा, मध्य प्रदेश विधानसभा किंवा हैद्राबाद विधानसभा यांपैकी कोणत्याही विधानसभेवर १९५२ साली त्या विधानसभेच्या सर्व निर्वाचन संघांना सदस्यांची निवड करण्याचे आवाहन ज्या सर्वात अगोदरच्या तारखेस करण्यात आले असेल (या खंडात यापुढे जिला " उक्त तारीख " असे म्हटले आहे) त्या तारखेस किंवा त्यानंतर निवडून आलेला सदस्य—

(एक) जर तो सदस्य म्हणून असतानाच मुंबई विधानसभेचा सदस्य म्हणूनही चालू राहिला असेल किंवा राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ (१९५६ चा ३७) अन्वये त्या विधानसभेवर निवडून आल्याचे मानण्यात आले असेल तर; किंवा

(दोन) जर तो सदस्य म्हणून असताना महाराष्ट्र विधानसभेचा सदस्य म्हणूनही चालू राहिला असेल किंवा मुंबई पुनर्रचना अधिनियम, १९६० (१९६० चा ११) अन्वये त्या विधानसभेवर निवडून आल्याचे मानण्यात आले असेल तर;

(ब) मुंबई विधानसभेचा त्या सभेवर उक्त तारखेस किंवा त्यानंतर नामनिर्देशित करण्यात आलेला सदस्य;

(क) मुंबई विधानपरिषदेचा, उक्त तारखेस किंवा त्यानंतर त्या परिषदेवर निवडून आलेला सदस्य—

(एक) जर तो सदस्य असतानाच मुंबई विधानपरिषदेचा सदस्य म्हणूनही चालू राहिला असेल किंवा राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ (१९५६ चा ३७) अन्वये त्या परिषदेवर निवडून आल्याचे मानण्यात आले असेल तर; किंवा

(दोन) जर तो सदस्य म्हणून असतानाच महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य म्हणूनही चालू राहिला असेल किंव; मुंबई पुनर्रचना अधिनियम, १९६० (१९६० चा ११) अन्वये त्या विधानपरिषदेवर निवडून आल्याचे मानण्यात आले असेल तर;

(ड) मुंबई विधानपरिषदेचा त्या परिषदेवर उक्त तारखेस किंवा त्यानंतर नामनिर्देशित करण्यात आलेला सदस्य आणि त्यामध्ये १ जानेवारी १९४६ रोजी किंवा त्यानंतर जी व्यक्ती ज्या कोणत्याही प्रांताचे किंवा कोणत्याही राज्याचे (भारतीय संस्थान धरून) क्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये अंतर्भूत होत असेल अशा प्रांतासाठी किंवा राज्यासाठी रचना करण्यात आलेल्या (कोणत्याही नावाने संबोधल्या जाणाऱ्या) कोणत्याही विधानसभेची किंवा विधानपरिषदेची निर्वाचित किंवा नामनिर्देशित सदस्य होती त्या कोणत्याही व्यक्तीचा,—

(एक) जर ती व्यक्ती, अशा ज्या कोणत्याही विधानसभेच्या किंवा विधानपरिषदेच्या कोणत्याही प्रादेशिक मतदारसंघाचे क्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग देखील महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये अंतर्भूत असेल अशा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी निवडून देण्यात आलेली असेल तर;

(दोन) जर तिला प्रादेशिक मतदार संघाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी निवडून देण्यात आलेले असेल किंवा ती नामनिर्देशित सदस्य असेल आणि तिच्या, कोणत्याही अशा विधानसभेवरील किंवा विधानपरिषदेवरील निवडणुकीच्या किंवा यथास्थिती नामनिर्देशनाच्या वेळी ती जेथे राहात होती किंवा तिचा व्यवसाय करत होती ती जागा, महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये असेल तर, समावेश होईल.

(२) राज्य विधानमंडळाच्या सदस्याच्या संबंधात '' पदावधी '' म्हणजे असा सदस्य म्हणून त्याची निवड किंवा नामनिर्देशन या संबंधीची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेस सुरू होणारी आणि ते पद रिक्त होण्याच्या तारखेस संपणारी मुदत.

**स्पष्टीकरण एक.**—विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक झाली असेल आणि कोणत्याही कारणासाठी कोणत्याही मतदारसंघात निवडणूक झाली नसेल आणि त्याच्यानंतर झालेल्या निवडणुकीत त्या मतदारसंघात एखादा सदस्य निवडून आला असेल तर त्या सदस्याच्या बाबतीत पदावधी हा, इतर मतदारसंघातील सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल ज्या तारखेस **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाला असेल त्या तारखेस सुरू झाला असे समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण दोन.**—राज्य शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे मान्य केलेल्या कारणासाठी किंवा कारणांसाठी राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सदस्याने आपल्या पदाचा राजीनामा दिला असेल त्या बाबतीत त्याच्या पदाच्या मुदतीची गणना करण्याच्या प्रयोजनासाठी, त्याने राजीनामा दिला नसता तर जितक्या मुदतीसाठी तो सदस्य म्हणून राहिला असता ती

मुदत जमेस धरण्यात येईल आणि त्याने त्या कालावधीसाठी देखील सदस्य म्हणून सेवा केली असे समजण्यात येईल :

परंतु असे की, तद्‌नुसार विचारात घ्यावयाची कमाल मुदत ही कोणत्या सदस्याच्या बाबतीत सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु आणखी असे की, एक भाषिक महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठीच्या आंदोलनास पाठिंबा देण्याकरिता एखाद्या सदस्याने आपल्या पदाचा राजीनामा दिलेला असल्यास, असा राजीनामा हा, या स्पष्टीकरणाच्या प्रयोजनार्थ मान्यता देण्यात आलेल्या कारणास्तव दिलेला राजीनामा असल्याचे मानण्यात येईल. आणि पहिल्या परंतुकात काहीही असले तरी, अशा कारणास्तव आपल्या पदाचा राजीनामा देणाऱ्या सदस्यांच्या बाबतीत, त्याचा पदावधी मोजताना, त्याने असा राजीनामा दिला नसता तर जेवढ्या मुदतीकरिता तो त्या पदावर राहिला असता, तो संपूर्ण पदावधी विचारात घेण्यात येईल आणि त्या मुदतीत देखील त्याने सदस्य म्हणून काम केले असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण तीन.**—ज्या बाबतीत भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७२, खंड (१) च्या उपबंधान्वये ज्या तारखेस कोणत्याही विधानसभेची मुदत संपली असती त्या तारखेपूर्वी, परंतु, सहा महिन्यांपेक्षा अगोदरची नसेल अशा वेळी विधानसभा विसर्जित करण्यात आली असेल त्या बाबतीत तिच्या कोणत्याही सदस्याचा पदावधी मोजण्याच्या प्रयोजनासाठी, जर विधानसभा अगोदर विसर्जित करण्यात आली नसती तर, तो जेवढ्या मुदतीत विधानसभा सदस्य म्हणून राहिला असता तेवढी मुदत विचारात घेण्यात येईल. आणि त्याने त्या मुदतीत देखील सदस्य म्हणून काम केले असल्याचे मानण्यात येईल :

परंतु या स्पष्टीकरणात काहीही अंतर्भूत असले तरीही, महाराष्ट्र विधानसभा ज्या तारखेस विसर्जित करण्यात आली त्या १७ फेब्रुवारी १९८० या तारखेस विद्यमान सदस्य असलेल्यांच्या बाबतीत, विधानसभा अशाप्रकारे विसर्जित झाली नसती तर ज्या कालावधीत तो विधानसभेचा सदस्य राहिला असता, तो कालावधी, त्या सदस्याचा पदावधी मोजताना जमेस धरला जाईल आणि त्याने त्या कालावधीतही सदस्य म्हणून काम केल्याचे मानण्यात येईल :

परंतु आणखी असे की, या स्पष्टीकरणामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, ज्या दिनांकास महाराष्ट्र विधानसभा विसर्जित करण्यात आली त्या १५ जुलै १९९९ या दिनांकास विद्यमान असलेल्या सदस्याच्या बाबतीत जर जिचे अशा प्रकारे विसर्जन झाले नसते तर असा सदस्य ज्या कालावधीसाठी विधानसभेचा सदस्य म्हणून पुढे चालू राहिला असता तो कालावधी अशा सदस्याच्या पदावधीची गणना करताना विचारात घेण्यात येईल, आणि त्याने त्या कालावधीसाठी देखील सदस्य म्हणून सेवा केली असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण चार.**—खंड (१) च्या परिच्छेद (क) व (ड) मध्ये उल्लेख केलेल्या मुंबई विधानपरिषदेच्या कोणत्याही सदस्याचा पदावधी लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या

कलम १५६ अन्वये कमी करण्यात आला असेल आणि त्याच्या नेहमीच्या पदावधीच्या समाप्तीपूर्वी त्यास निवृत्त करण्यात आले असेल त्या बाबतीत त्याने ज्या कालावधीत असा सदस्य म्हणून काम केले असेल तो कालावधी, या अधिनियमाच्या कलम ३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी विचारात घेण्यात येईल आणि असा सदस्य म्हणून त्याने काम केलेल्या एका पूर्ण वर्षाच्या प्रत्येक कालावधीसाठी दरमहा पंधरा हजार इतके निवृत्तिवेतन त्यास देण्यात येईल.

३. **सदस्यांना देय असलेले निवृत्तिवेतन.**––(१) राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य म्हणून निवडून आलेल्या अथवा नामनिर्देशित झालेल्या व्यक्तीने, ज्यानी " सदस्य " म्हणून शपथ घेतली आहे. अथवा घेतल्यास, अशा व्यक्तीस, दरमहा रुपये १५,००० निवृत्तीवेतन देण्यात येईल :

परंतु, असे की, ज्यावेळी एखाद्या व्यक्तीने पाच वर्षापेक्षा जास्त मुदतीसाठी सदस्य म्हणून सेवा केली असेल, त्यास त्याच्या पाच वर्षांवरील प्रत्येक वर्षासाठी दरमहा एक हजार रुपये या प्रमाणात जादा निवृत्तिवेतन दिले जाईल :

परंतु आणखी असे की, जर एखादी व्यक्ती भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १९१ च्या खंड (१) अन्वये राज्य विधानमंडळाचा सदस्य असण्यास अपात्र ठरेल तर, तिला निवृत्तीवेतन अनुज्ञेय राहणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनासाठी वर्षाची गणना करताना एकाद्या व्यक्तीने परिषदेच्या किंवा विधानसभेच्या आपल्या सदस्यत्वाच्या आधारे विधानपरिषदेचा सभापती किंवा उप सभापती किंवा विधानसभेचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा मंत्री, राज्यमंत्री, उप मंत्री किंवा संसद सचिव म्हणून किंवा त्यापैकी एकापेक्षा अधिक पदांवर, ज्या मुदतीत सेवा केली असेल ती मुदत जमेस धरली जाईल.

४. **विवक्षित परिस्थितीत निवृत्तिवेतन स्थगित ठेवणे किंवा कमी करणे.––**

(१) ज्यावेळी कलम ३ अन्वये निवृत्तिवेतनाचा हक्क असलेली कोणतीही व्यक्ती ही––

(अ) भारताच्या राष्ट्रपतींच्या किंवा उप राष्ट्रपतींच्या पदावर निवडली गेली असेल किंवा एखाद्या राज्याच्या राज्यपालांच्या पदावर किंवा एखाद्या संघराज्य क्षेत्राच्या प्रशासकाच्या पदावर तिची नेमणूक करण्यात आली असेल तर, किंवा

(ब) राज्यसभेचा किंवा लोकसभेचा किंवा एखाद्या राज्याच्या किंवा संघराज्य क्षेत्राच्या विधानसभेचा किंवा एखाद्या राज्याच्या कोणत्याही विधानपरिषदेचा सदस्य झाली असेल तर, किंवा

(क) केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही महामंडळाच्या किंवा कोणत्याही स्थनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली वेतनावर सेवानियुक्ती झाली असेल किंवा अशा सरकारकडून, महामंडळाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून कोणतेही पारिश्रमिक मिळण्याचा इतर प्रकारांनी तिला हक्क असेल तर,

ती तसे पद धारण करण्याचे" किंवा 'असा सदस्य म्हणून असण्याचे किंवा अशाप्रकारे सेवानियुक्त असण्याचे किंवा अशा पारिश्रमिकाचा तिला हक्क असण्याचे चालू राहिल या मुदतीत कलम ३ अन्वये कोणतेही निवृत्तिवेतन मिळण्याचा हक्कदार असणार नाही.

**शंका निरसन**—३. शंका निरसनासाठी याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, या अधिनियमाद्वारे सुधारलेल्या मुख्य अधिनियमाच्या कलम २ चा खंड (२), यातील स्पष्टीकरण एक व दोन यांच्या तरतुदी, १९ जुलै १९८७ रोजी अंमलात आल्या असल्याचे मानण्यात येईल, आणि त्या तरतुदींना अनुलक्षून जो सदस्य मुख्य अधिनियमाची कलमे ३, ४ व ६ आणि त्याखाली केलेले नियम यांच्या तरतुदींना अधीन राहून, निवृत्तिवेतन मिळण्यास पात्र ठरत असेल त्याला अशा निवृत्तिवेतनाची, दिनांक १९ जुलै १९८७ पासूनची थकबाकीही मिळण्याचा हक्क असेल.

[१](२) * [ ]

(३) या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही कायद्यान्वये किंवा अन्यथा, केंद्र सरकारकडून किंवा कोणत्याही राज्य शासनाकडून, किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणास खालच्या कोणत्याही महामंडळाकडून, राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सदस्याला मिळणाऱ्या कोणत्याही निवृत्तिवेतनावर, किंवा केंद्र सरकारकडून कोणत्याही राज्य शासनाकडून स्वातंत्र्य सैनिक म्हणून मिळणाऱ्या कोणत्याही निवृत्तिवेतनावर परिणाम होणार नाही.

**४अ. सदस्याच्या विधवेला, विधुराला किंवा अज्ञान अपत्याला निवृत्तिवेतन देण्याबाबत.**—
(१) दिनांक १ ऑगस्ट १९८८ पासून, पोट कलम (३) च्या तरतुदीस अधीन राहून कोणताही सदस्य, सदस्य असणाऱ्या पदावधीत मरण पावल्यास, त्याची विधवा पत्नी असल्यास, तिला त्या सदस्याच्या मृत्यूच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीकरिता दरमहा एक हजार रुपये एवढे निवृत्तिवेतन देण्यात येईल.

(२) ज्यास सदस्य म्हणून या अधिनियमान्वये निवृत्तिवेतन मिळत असेल किंवा कोणतेही निवृत्तिवेतन मिळण्यास जो हक्कदार असेल असा कोणताही सदस्य मरण पावल्यास, अशा सदस्याची पत्नी असल्यास, तिला १ मे २००८ पासून पोट-कलम (३) च्या तरतुदीस अधीन राहून, अशा सदस्यास त्याच्या मृत्यूच्या दिनांकास देय असलेल्या निवृत्तिवेतनाच्या रकमेच्या पन्नास टक्के किंवा साडे सात हजार रुपये या दराने दोहोंपैकी अधिक असेल ती रक्कम या दराने दरमहा निवृत्तिवेतन देण्यात येईल.

(२-अ) या अधिनियमान्वये ज्या सदस्याला निवृत्तीवेतन मिळत होते किंवा जो असा सदस्य म्हणून निवृत्तिवेतन घेण्यास हक्कदार होता आणि जो दिनांक १ जून १९९० पूर्वी मृत्यू पावला अशा सदस्याच्या विधवेस किंवा विधुरास दिनांक १ जुलै २००९ पासून पोट-कलम (३) च्या तरतुदीस अधीन राहून, अशा सदस्यास त्याच्या मृत्यूच्या दिनांकाला जेवढे निवृत्तिवेतन देय होते त्या रकमेच्या पन्नास टक्के किंवा साडे सात हजार रुपये या दोहोंपैकी अधिक असेल ती रक्कम या दराने दरमहा निवृत्तिवेतन देण्यात येईल.

(२-ब) पोट-कलम (१), (२) किंवा (२अ) मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, परंतु पोट-कलम (३) च्या तरतुदीना अधीन राहून, जो राज्य विधानमंडळाचा सदस्य या अधिनियमान्वये निवृत्तिवेतन मिळण्यास हक्कदार नव्हता अशा सदस्याच्या विधवेस किंवा विधुरास १ जुलै २००९ पासून दरमहा साडे सात हजार रुपये याप्रमाणे निवृत्तिवेतन देण्यात येईल.

(२-क) दिनांक १ जानेवारी २००६ पासून मृत सदस्याच्या विधवेच्या किंवा विधुराच्या मृत्यूच्या पश्चात त्या सदस्याचे अज्ञान अपत्य किंवा अपत्ये हयात असतील तर, अशा अज्ञान अपत्याला किंवा अपत्यांना, विधवा किंवा विधूर यांना ज्याप्रमाणे निवृत्तिवेतन देय होते त्याचप्रमाणे दरमहा निवृत्तिवेतन देण्यात येईल. आणि निवृत्तिवेतन, नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने देण्यात येईल.

(३) जेव्हा अशा विधवेने किंवा विधुराने पुनर्विवाह केला असेल त्या बाबतीत, ती किंवा तो, तिने किंवा त्याने पुनर्विवाह केल्याच्या दिनांकापासून, या कलमान्वये निवृत्तिवेतन मिळण्यास हक्कदार असणार नाही.

५. **नियम व आदेश करण्याची शक्ती.**—(१) (अ) या कलमान्वये नियम किंवा आदेश करण्याच्या प्रयोजनासाठी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यांमधून, त्या परिषदेच्या सभापतीकडून नामनिर्देशित करण्यात येतील असे पाच सदस्य आणि महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांमधून, त्या सभेच्या अध्यक्षांकडून नामनिर्देशित करण्यात येतील असे दहा सदस्य यांची मिळून, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात येईल आणि वित्त मंत्री हा तिचा पदसिद्ध सदस्य व समिती प्रमुख असेल.

(ब) खंड (अ) अन्वये स्थापन केलेल्या संयुक्त समितीला तिच्या कार्याचे विनियमन करण्याची शक्ती असेल.

(क) वित्त मंत्री खेरीज करून, संयुक्त समितीचा सदस्य, त्याच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून एक वर्षासाठी सदस्य म्हणून पद धारण करील आणि संयुक्त समितीतील कोणतेही रिकामे झालेले पद हे सभापती किंवा यथास्थिती अध्यक्ष यांच्याकडून नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येईल.

(२) (अ) पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेल्या संयुक्त समितीस, राज्य शासनाशी विचार विनिमय करून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम किंवा आदेश करता येतील.

(ब) विशेषकरून आणि पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता अशा नियमांत किंवा आदेशांत पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींची तरतूद करण्यात येईल :—

(एक) ज्या नमुन्यात आणि ज्या प्राधिकरणाकडे निवृत्तिवेतनासाठी अर्ज करण्यात येईल तो नमुना व ते प्राधिकरण;

(दोन) निवृत्तिवेतनाच्या अर्जासोबत सादर करावयाची प्रमाणपत्रे;

(तीन) निवृत्तिवेतन घेण्याच्या वेळी करावयाची प्रतिज्ञापने;

(चार) या अधिनियमाची अंमलबजावणी व कार्यान्वयन योग्यरित्या होण्यासाठी आवश्यक अशा इतर कोणत्याही बाबी.

(३) पोट-कलम (अ) अन्वये केलेले सर्व नियम किंवा आदेश हे परिषदेच्या सभापतींकडून आणि सभेच्या अध्यक्षांकडून संमत झाल्याशिवाय व त्यांनी ते कायम केल्याशिवाय आणि **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्याशिवाय अंमलात येणार नाहीत. अशाप्रकारे नियम किंवा आदेश प्रसिद्ध करणे हे ते करण्यात आल्याचा निर्णायक पुरावा असेल.

(४) या कलमाखालील कोणतेही नियम किंवा आदेश हे या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेच्या पूर्वी नसेल अशा कोणत्याही तारखेपासून भूतलक्षी प्रभावाने असतील असे करता येतील.

(५) या कलमाखाली केलेल्या नियमांचा व आदेशांचा प्रभाव हा ते जणू या अधिनियमातच अधिनियमित केले असल्याप्रमाणे राहील.

६. **निवृत्तिवेतनाशी संबंधित प्रश्नावरील निर्णय.**—एखाद्या व्यक्तीला निवृत्तिवेतनाचा हक्क आहे किंवा नाही याविषयी किंवा निवृत्तिवेतनाच्या रकमेविषयी किंवा या अधिनियमाखाली तिला ज्या मुदतीकरिता निवृत्तिवेतन मिळण्याचा हक्क असेल त्या मुदतीविषयी कोणताही संशय किंवा वाद उद्भवल्यास ती बाब विचारार्थ महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतींकडे आणि महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांकडे पाठविण्यात येईल आणि ते राज्य शासनाशी विचारविनिमय करून त्यावर निर्णय देतील. सभापतींचा आणि अध्यक्षांचा निर्णय अंतिम राहील.

# महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन नियम, १९७७

# महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन नियम, १९७७

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—(१) या नियमांना महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन नियम, १९७७ असे म्हणता येईल.

(२) ते १ एप्रिल १९७७ पासून अंमलात आले असल्याचे मानण्यात येतील.

२. **व्याख्या.**—(१) संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर, या नियमात,—

(अ) " अधिनियम " म्हणजे, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १) ;

(ब) " जोडपत्र " म्हणजे, त्या नियमांस जोडण्यात आलेले जोडपत्र ;

(क) " सभागृह " म्हणजे, विधानसभा किंवा यथास्थिति विधानपरिषद ;

(ड) " सदस्य " म्हणजे, अधिनियमाच्या कलम २, खंड (१) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे राज्य विधानमंडळाचा सदस्य.

(२) अधिनियमात वापरलेल्या आणि या नियमात व्याख्या न केलेल्या शब्दाचा आणि वाक्प्रयोगांचा अर्थ, अधिनियमात त्यांना जो अर्थ दिलेला आहे तोच असेल.

३. **निवृत्तिवेतनासाठी अर्ज.**—अधिनियमाच्या कलम ३ अन्वये निवृत्तिवेतनाचा हक्क असलेल्या आणि निवृत्तिवेतन घेऊ इच्छिणारी व्यक्ती जोडपत्र १ मध्ये विहित केलेल्या " निवृत्तिवेतन अर्जाच्या नमुन्याप्रमाणे " अर्ज करील. असा अर्ज सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई किंवा यथास्थिति नागपूर यांस उद्देशून पाठविण्यात येईल.

४. **निवृत्तिवेतन आस्थगित किंवा कमी करण्यासाठी पडताळणी करण्याकरिता अर्जाच्या नमुन्यातील तपशील.**—अधिनियमान्वये एखाद्या व्यक्तीस देय असलेले निवृत्तिवेतन अधिनियमाच्या कलम ४ मध्ये उल्लेखिलेल्या परिस्थितीत म्हणजे ती व्यक्ती विवक्षित पदावर निवडून आली असेल तर किंवा विवक्षित विधानमंडळाचा सदस्य झाल्यास किंवा शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून किंवा महामंडळाकडून पारिश्रमिक घेत असेल तर, आस्थगित किंवा कमी करण्यात येईल. प्रत्येक अर्जदार सत्य व बरोबर माहिती देईल आणि तो असे कोणतेही पद धारण करीत आहे किंवा नाही हे प्रतिज्ञापत्रित करील.

५. **नियतकालिक प्रतिज्ञापने करणे.**—निवृत्तिवेतन घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने, कलम ४(१) (अ) मध्ये उल्लेखिलेले पद धारण करण्यासंबंधीचे किंवा कलम ४(१) (ब) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे विधानमंडळाचा सदस्य असल्यासंबंधीची किंवा अधिनियमाच्या कलम ४(१) (क) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पगारी नोकर असल्यासंबंधीची किंवा पारिश्रमिक घेत असल्यासंबंधीची पडताळणी करण्यासाठी द्यावयाची नियतकालिक प्रतिज्ञापने जोडपत्र दोनमध्ये विहित करण्यात आली आहेत. निवृत्तिवेतन घेतेवेळी ही प्रतिज्ञापने करून वेळोवेळी वस्तुस्थिती प्रमाणित करण्यात येईल.

६. **निवृत्तिवेतन घेणे**.—(१) निवृत्तिवेतनधारक महाराष्ट्र राज्याच्या अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांच्याकडून किंवा महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही कोषागारातून, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक डीएटी. १३७५/३/७५ एडीएम-९, दिनांक १८ सप्टेंबर १९७५ यामध्ये घालून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार ज्या बँकेने राज्य शासनास क्षतिपूर्ती बंधपत्र (इंडेम्निटी बाँड) करून दिले आहे अशा बँकेत एकाच नावावर बचत बँक खाते उघडून आपले निवृत्तिवेतन घेईल. अशी क्षतिपूर्ती बंधपत्रे ज्यांनी करून दिली आहेत अशा बँकांची यादी जोडपत्र ' तीन ' मध्ये दिलेली आहे.

(२) निवृत्तिवेतनधारकाला त्याचे निवृत्तिवेतन महाराष्ट्राच्या बाहेरील ठिकाणी पाहिजे असेल तर त्याने लेखी विनंती केल्यानंतर त्याला महाराष्ट्राच्या महालेखाकारामार्फत त्या ठिकाणच्या कोषागारातून निवृत्तिवेतनाची रक्कम देण्यात येईल.

७. **पडताळणीसाठीचे अभिलेख.**—(१) सर्वसाधारणपणे, अधिनियमात दिलेल्या काही अपवादांना अधीन राहून अधिनियमाच्या प्रयोजनासाठी एखाद्या सदस्याचा पदावधी तो सदस्य म्हणून निवडून आल्याच्या किंवा नामनिर्दिष्ट केल्याच्या अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून सुरू होतो आणि तो पदावधी, राजीनामा, पदावधीची समाप्ती, सभागृहाचे विसर्जन इत्यादीमुळे त्याचे पद रिक्त झाल्याच्या तारखेस संपतो. मूळ अभिलेख सुरुवातीपासून गोळा करण्यात येतील आणि ते जोडपत्र चारमध्ये दिलेल्या निदेशानुसार विधानमंडळ सचिवालयात क्रमाने लावण्यात येतील.

(२) ही सर्व माहिती एकत्र त्यानंतर नाव, पत्ता कोणत्याही व्यक्तीने विधानमंडळाचा सदस्य म्हणून वेळोवेळी केलेली सेवा यांच्या तपशिलासह एका योग्य अशा टिप्पणीची नोंद योग्य त्या नोंदवहीत करण्यात येईल आणि महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या अवर सचिवाच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यांकडून ती साक्षांकित करण्यात येईल. त्यानंतर, यामुळे निवृत्तिवेतनासाठी अर्हताप्राप्त असलेल्या एकूण सेवेची पडताळणी करण्यासाठी आणि देय आणि अनुज्ञेय असलेल्या निवृत्तिवेतनाची रक्कम काढण्यासाठी मूळ अभिलेख तयार करण्यात येईल.

८. **सेवेची पडताळणी आणि निवृत्तिवेतन मंजूर करणे.**—एखाद्या व्यक्तीने केलेल्या सेवेची निवृत्तिवेतन उप शाखेद्वारे, पडताळणी करण्यात येईल आणि अवर सचिवाच्या दर्जाहून कमी दर्जाच्या नसणाऱ्या अधिकाऱ्याकडून ती सेवा प्रमाणित करण्यात येईल. पडताळणीनंतर, निवृत्तिवेतनासाठी अर्हताप्राप्त असलेली सेवा आणि निवृत्तिवेतनाची रक्कम काढण्यात येईल. अशा रीतीने काढलेले निवृत्तिवेतन संबंधित उप सचिव तपासून पाहील व तात्पुरती मान्य करील. नंतर विधानमंडळ सचिव ती रक्कम अंतिमरित्या मान्य करील व निवृत्तिवेतन मंजूर करील.

९. **निवृत्तिवेतन प्रदान आदेश जारी करणे.**—निवृत्तिवेतन मंजूर झाल्यानंतर, निवृत्तिप्रदान आदेश महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय तयार करील आणि ते महाराष्ट्राच्या महालेखाकाराकडे पाठविल.

**१०. निवृत्तिवेतन प्रदानाची कार्यपद्धती.**---(१) विधानमंडळ सचिवालयाची निवृत्तिवेतन उप शाखा निवृत्तिवेतन प्रदान आदेशाचे दोन्ही अर्धे भाग महाराष्ट्राचे महालेखाकार यांच्याकडे, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई किंवा यथास्थिति कोषागार अधिकारी यांच्याकडे, निवृत्तिवेतनधारकाला ज्या तारखेपासून निवृत्तिवेतन द्यावयाचे ती तारीख दर्शवून पाठविण्यासाठी रवाना करील. निवृत्तिवेतन प्रदान आदेश हा अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई किंवा कोषागार अधिकारी यांच्याकडे पाठविण्यासाठी महाराष्ट्राच्या महालेखाकाराकडे अग्रेषित करण्यात येईल तेव्हा विधानमंडळ सचिवालय निवृत्तिवेतनधारकाला सूचना देईल. महालेखाकार, निवृत्तिवेतन प्रदान आदेश अधिदान व लेखा अधिकाऱ्यास किंवा कोषागार अधिकाऱ्यास पाठविताना त्याची माहिती निवृत्तिवेतनधारकास कळवील व त्यात निवृत्तिवेतन प्रदान आदेश क्रमांक, निवृत्तिवेतनाची रक्कम आणि ज्या तारखेपासून निवृत्तिवेतन देय असेल ती तारीख नमूद करील.

(२) निवृत्तिवेतनधारकास, ज्या बँकेने शासनाला क्षतिपूर्ती बंधपत्र दिले असेल त्या बँकेत एकाच नावावरील एक नवीन बचत बँक खाते उघडील. तो/ती आपल्या बँकेचे नाव आणि त्याचे निवृत्तिवेतन ज्या खाते क्रमांकावर जमा करावयाचे तो खाते क्रमांक अधिदान व लेखा, मुंबई/कोषागार कार्यालय यांना कळवील. त्याचप्रमाणे तो/त्याच्या वतीने त्याचे निवृत्तिवेतन त्याच्या एकाच नावाच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी स्वीकारण्यास बँकेला प्राधिकृत करील आणि त्याच्या वतीने स्वीकारलेल्या त्याच्या निवृत्तिवेतनाच्या रकमेबद्दल बँकेने दिलेली पावती ही कायदेशीर पावती मानावी असेही प्राधिकृत करील. या प्रयोजनासाठी निवृत्तिवेतनधारक अधिदान व लेखा अधिकाऱ्याकडे/ कोषागार अधिकाऱ्याकडे जोडपत्र ' पाच ' मधील नमुन्यात व्यक्तिशः किंवा त्याच्या बँकेमार्फत सूचना देईल. निवृत्तिवेतन प्रदान आदेश क्रमांक व त्याच्या निवृत्तिवेतनाची रक्कम या संबंधीचा तपशील, महाराष्ट्राच्या लेखा-महालेखाकाराकडून आलेल्या माहितीच्या आधारे निवृत्तिवेतनधारकांकडून भरण्यात येईल.

(३) (एक) अधिदान व लेखा अधिकारी/कोषागार अधिकारी सूचनेवर छापलेल्या नमुन्यात सूचना मिळाल्याचे कळवील.

(दोन) अधिदान व लेखा अधिकारी/कोषागार अधिकारी धनादेशाद्वारे निवृत्तिवेतन प्रदान करण्याच्या बाबतीत तरतूद केलेल्या पद्धतीनुसारच पहिल्या वेळेस निवृत्तिवेतनधारकास ओळखील.

(तीन) अधिदान व लेखा अधिकारी/कोषागार अधिकारी निवृत्तिवेतन बँकेमार्फत प्रदान करावयाचे आहे याची नोंद निवृत्तिवेतन प्रदान आदेशाच्या दोन्ही अर्ध्या भागावर करील.

(४) निवृत्तिवेतनधारकाने कोणतीही बिले प्रस्तुत करण्याची आवश्यकता नाही. अधिदान व लेखा अधिकारी/कोषागार अधिकारी बिले तयार करील. पुढील महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या तारखेस मिळेल अशा रीतीने प्रत्येक महिन्याच्या अखेरीस अधिदान व लेखा कार्यालय/संबंधित कोषागार, निवृत्तिवेतनाची रक्कम निवृत्तिवेतनधारकांच्या एकाच नावावर असलेल्या बँकेच्या खात्यात जमा करील.

हे खाते निवृत्तिवेतनधारकांकडून स्वतःच्या नावाने किंवा त्रयस्थ व्यक्तीस चेक देऊन निवृत्तिवेतन काढून चालविण्यात येईल. निवृत्तिवेतनाची रक्कम जमा करण्याच्या प्रयोजनासाठी निवृत्तिवेतनधारकाने एकाच नावाने जे बँक खाते उघडले असेल त्यावर निवृत्तिवेतनधारकांना त्रयस्थ व्यक्तीच्या नावाने चेक देता येईल. परंतु, त्याने प्रत्येक महिन्यास येणाऱ्या निवृत्तिवेतनाची पावती संबंधित बँकेस देण्यास कबूल केले पाहिजे. अशी व्यवस्था होईल तेव्हा बँक त्रयस्थ व्यक्तींच्या नावावरील चेकद्वारे पैसे काढण्यास अशा रीतीने परवानगी देऊ शकेल की, कोणत्याही वेळी स्वतः/धारकाने (बेअररने) काढलेली एकूण रक्कम, ही ज्या रकमेसाठी त्यांच्याकडे जमा रकमांची पावती असेल त्या एकूण रकमेपेक्षा अधिक होणार नाही.

(५) मार्च महिन्याचे पैसे एप्रिलमध्ये देताना वर्षातून एकदा हयातीचे प्रमाणपत्र द्यावे लागेल. या हयातीच्या प्रमाणपत्रावर ज्या बँकेतून निवृत्तिवेतनधारक निवृत्तिवेतन घेत असेल त्या बँकेच्या व्यवस्थापकास/एजंटास सही करता येईल.

(६) जोडपत्र दोनमधील प्रतिज्ञापन सूचनेच्या नमुन्यांसह (जोडपत्र पाच) सहा महिन्यांतून एकदा, जुलै आणि जानेवारी महिन्यात मागील सहा महिन्यांच्या मुदतीकरिता प्रस्तुत करावे लागेल. हयातीचे प्रमाणपत्र किंवा प्रतिज्ञापन बँकेमार्फत किंवा सरळ अधिदान व लेखा कार्यालयाकडून/कोषागार कार्यालयाकडून स्वीकारण्यात येईल.

**११. निवृत्तिवेतन देय होते ती तारीख.**––(१) निवृत्तिवेतन प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेस किंवा त्यानंतर मागील महिन्याचे किंवा थकबाकी म्हणून दरमहा देय होईल.

(२) जर महिन्याचा पहिला दिवस, रविवारी किंवा यथास्थिति ज्या दिवशी कोषागारातून किंवा यथास्थिति बँकेतून निवृत्तिवेतन देण्यासाठी निधी काढता येत नाहीत अशा सरकारी सुटीच्या दिवशी येत असेल तर, निवृत्तिवेतनाच्या बिलाच्या रकमांचे प्रदान ज्या महिन्याशी ती संबंधित असतील त्या महिन्याच्या कामाच्या शेवटच्या दिवशी करण्यात येईल. मात्र मार्च महिन्याच्या निवृत्तिवेतनाच्या बिलांच्या बाबतीत अपवाद केला जाईल व ती बिले पुढील महिन्याच्या कामाच्या पहिल्या दिवशी देण्यात येतील.

**१२. निवृत्तिवेतनाची थकबाकी.**––(१) एकाच नावाच्या बचत बँक खात्यातून निवृत्तिवेतनाची रक्कम सहा महिने काढण्यात आली नाही तर बँक तशी सूचना अधिदान व लेखा अधिकाऱ्यास/कोषागार अधिकाऱ्यास देईल आणि पुढील रकमा काढण्याचे काम बंद करील.

(२) निवृत्तिवेतनधारक आपले सहा महिन्यांचे निवृत्तिवेतन न घेण्याबाबतची कारणे अधिदान व लेखा अधिकाऱ्यास/कोषागार अधिकाऱ्यास कळवील तर, अधिदान व लेखा अधिकाऱ्यास/कोषागार अधिकाऱ्यास आधी देण्यात न आलेली रक्कम देण्याबाबत बँकेस प्राधिकृत करता येईल व वरील पोट-नियम (३) च्या आधारे निवृत्तिवेतन देण्याचे बंद होईल ते खेरीजकरून नंतरच्या प्रत्येक महिन्यास निवृत्तिवेतनाची रक्कम जमा करण्याचे चालू ठेवता येईल.

(३) जर निवृत्तिवेतन १२ महिन्यांपेक्षा अधिक काळ घेतले गेले नाही तर, निवृत्तिवेतन हे अधिदान व लेखा अधिकाऱ्याकडून/कोपागार अधिकाऱ्याकडून दिले जाण्याचे बंद होईल. जर निवृत्तिवेतनधारकाने त्यानंतर प्रदानासाठी विनंती केली तर अधिदान व लेखा अधिकाऱ्यास/कोपागार अधिकाऱ्यास प्रदान पुन्हा सुरू करता येईल तथापि, तो पुढील बाबतीत उक्त प्रदाने करणार नाही :––

(एक) जर थकित निवृत्तिवेतन हे प्रथमच द्यावयाचे निवृत्तिवेतन असेल तर, किंवा

(दोन) जर थकबाकीची रक्कम रु. ५००० पेक्षा अधिक असेल तर, निवृत्तिवेतन ज्याने मंजूर केले असेल त्या प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय ते दिले जाणार नाही. मंजुरी लेखापरीक्षा अधिकाऱ्यामार्फत मिळविण्यात येईल :

परंतु कोणत्याही प्रकरणी, सहा वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी निवृत्तिवेतन घेण्यात आले नाही तर ते महाराष्ट्राच्या महालेखाधिकाराने प्राधिकारपत्र दिल्याशिवाय देण्यात येणार नाही.

१३. **निवृत्तिवेतनधारकाचा मृत्यू.**––मृत झालेल्या निवृत्तिवेतनधारकाच्या बाबतीत देय असलेल्या निवृत्तिवेतनाच्या थकबाकीच्या प्रदानाचे पुढीलप्रमाणे विनियमन करण्यात येईल :––

(१) निवृत्तिवेतन हे निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यूच्या दिवसापर्यंत देता येईल. ज्यावेळी मृत्यू झाला असेल त्यावेळेचा तत्संबंधातील मागणीवर कोणताही परिणाम होणार नाही.

(२) निवृत्तिवेतनधारकाचा मृत्यू झाल्यावर प्रत्यक्ष देय असलेली कोणतीही थकबाकीची रक्कम त्याच्या वारसास देता येईल. परंतु, त्यांनी त्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यापासून एक वर्षाच्या आत अर्ज केला पाहिजे. अशा प्रकारचा अर्ज त्यानंतर करण्यात आल्यास, ज्याच्याकडून निवृत्तिवेतन संबंधात मंजुरी देण्यात आली होती अशा प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय अशी रक्कम देण्यात येणार नाही. अशी मंजुरी ही महाराष्ट्राच्या महालेखाकारामार्फत घेण्यात येईल :

परंतु, थकबाकीची रक्कम १,००० रुपयांपेक्षा अधिक नसेल व प्रकरण हे विशिष्ट, स्वरूपाचे नसेल तर, महाराष्ट्राच्या महालेखाकारास, आपल्या स्वतःच्या प्राधिकारानुसार थकबाकीच्या रकमेस मंजुरी देता येईल.

(३) पोट-नियम (१) आणि (२) यांना अधीन राहून, मृत निवृत्तिवेतनधारकास देय असलेली थकबाकीची रक्कम पुढीलप्रमाणे देता येईल :––

(एक) जेव्हा देय असलेली रक्कम रुपये ५,००० पेक्षा अधिक नसेल तेव्हा, अशी रक्कम मृत निवृत्तिवेतनधारक त्याच्या मृत्यूच्या लगतपूर्वी सर्वसाधारणतः ज्या जिल्ह्यात राहत होता त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशानुसार देता येईल. असा जिल्हाधिकारी, मागणीदारांच्या अधिकारासंबंधात व हक्कासंबंधात, त्यास पुरेशी वाटेल अशी चौकशी करील.

(दोन) जेव्हा देय रक्कम ही रुपये ५,००० पेक्षा अधिक असेल तेव्हा, मागणीदाराने अध्यक्षांकडून किंवा सभापतींकडून भाग पाडण्यात येईल त्याप्रमाणे जामीनदाराचा जामीन घेऊन क्षतिपूर्ती बंधपत्र (इंडेम्निटी बाँड) करून दिल्यावर अध्यक्षांच्या किंवा सभापतींच्या आदेशानुसार (मागणीदाराचा अधिकार व हक्क यांच्या संबंधात अध्यक्षांची किंवा यथास्थिती सभापतींची खात्री झाली असेल व नेहमीची वैध, प्राधिकारपत्रे सादर करण्यासंबंधी आग्रह धरल्यास मागणीदारास निष्कारण त्रास होईल असे त्याचे मत होईल तरच असा आदेश काढण्यात येईल) अशी रक्कम देता येईल.

(तीन) वरील खंड (एक) व (दोन) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही ज्या बाबतीत मागणीदाराच्या अधिकारांसंबंधात व हक्कासंबंधात कोणतीही शंका असेल त्याबाबतीत, मागणीदाराने, मृत निवृत्तिवेतनधारकाच्या मालमत्तेचा कारभार त्यांच्याकडे देण्यासंबंधातील पुराव्या दाखलचे मृत्यूपत्र प्रमाण किंवा प्रबंधपत्र किंवा प्रमाणपत्रधारकास मृत निवृत्तिवेतनधारकास देय असलेल्या थकबाकीची रक्कम मिळण्याचा हक्क असल्याबद्दलचे भारतीय वारसा हक्क अधिनियम, १९२५ अन्वये किंवा सन १८२७ चा मुंबई विनियम क्रमांक ८ अन्वये देण्यात आलेले प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय, कोणतीही रक्कम देण्यात येणार नाही.

(४) निवृत्तिवेतनाच्या थकबाकीची रक्कम देण्यात आल्यानंतर, अधिदान व लेखा अधिकाऱ्याकडून/कोषागार अधिकाऱ्याकडून निवृत्तिवेतन प्रदान आदेशाचे दोन्ही भाग निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यूच्या तारखेच्या अहवालासह महालेखाकारास परत करण्यात येतील.

**१३अ. कुटुंब वेतन**--(१) सदस्याला, जोडपत्र सहा मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात यथास्थिती आपल्या पत्नीस किंवा पतीस नामनिर्देशित करता येईल व अशा नामनिर्देशनानुसार तिला किंवा त्याला कुटुंब वेतन देय असेल.

(२) अधिनियमाच्या कलम ४अ, अनुसार कुटुंबवेतनास हक्कदार असलेली मृत सदस्याची विधवा किंवा यथास्थिती विधुर जोडपत्र सात मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यामध्ये प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय यांच्याकडे अर्ज करील.

(३) राज्य विधानमंडळाला कोणत्याही सभागृहात, मरण पावलेल्या सदस्याच्या निधनाचे वृत्त देण्यात आल्यानंतर प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, अशा सदस्याच्या विधवेला किंवा विधुराला कुटुंब वेतनासाठी अर्ज करण्याबाबत विनंती करणारे पत्र पाठवील.

(४) ज्याप्रकरणात पोट-नियम (१) अन्वये कोणतेही नामनिर्देशन केले नसेल त्या प्रकरणी, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय, मृत सदस्याची विधवा किंवा यथास्थिती विधुर याला कुटुंबवेतन देण्याच्या प्रयोजनार्थ, अशी विधवा किंवा विधुर यांच्याबाबत संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडून माहिती प्राप्त करील.

**१३ब. सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी कुटुंब वेतन मिळण्याचा ज्यांना हक्क नव्हता अशा विधवेला किंवा विधुराला कुटुंब वेतन.---**

(१) अधिनियमाच्या कलम ४ अ च्या पोट-कलम २ब च्या तरतुदीनुसार कुटुंबवेतन मिळण्यास हक्कदार असलेल्या, मृत सदस्याच्या विधवेला किंवा यथास्थिती विधुराला प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय यांच्याकडे जोडपत्र सात मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कुटुंबवेतन अर्जाच्या नमुन्यामध्ये अर्ज करता येईल.

(२) नियम १३अ च्या पोट-कलम (२), (३) व (४) मधील तरतुदी अशा कुटुंब वेतनाच्या बाबतीत योग्य त्या फेरफारासह लागू असतील.

**१३क. अज्ञान मूल किंवा मुलांना कुटुंब वेतन.---**

(१) अधिनियमाच्या कलम ४अ च्या पोट-कलम (२क) च्या तरतुदीन्वये कुटुंबावेतन मिळण्यास हक्कदार असलेल्या मृत सदस्याच्या विधवेला किंवा यथास्थिती विधुराला तिच्या किंवा त्याच्या अज्ञान मुलांना नावांचा जोडपत्र आठ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यामध्ये निर्देश करुन, त्यांचे कुटुंबवेतनासाठी नामनिर्देशन करता येईल.

(२) संबंधित कोषागार अधिकाऱ्याकडून प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांना, या अधिनियमान्वये कुटुंब वेतन मिळण्यास हक्कदार असलेली विधवा किंवा विधुर यांच्या मृत्युबाबत कळविण्यात आल्यानंतर तो संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडून अज्ञान मुलांच्या पालकांविषयी माहिती प्राप्त करील आणि पालकाला कुटुंब वेतनासाठी अर्ज करण्याबाबत कळवील.

(३) कुटुंब वेतनास हक्कदार असणारी विधवा किंवा यथास्थिती विधूर यांनी अज्ञान मुलांच्या नावे कोणतेही वैध नामनिर्देशन केले नसेल त्याबाबतीत, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय अज्ञान मुलांना कुटुंब वेतन देण्याच्या प्रयोजनार्थ, अशा अज्ञात १आणि अशा मुलांच्या पालकांबाबत संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडून माहिती प्राप्त करील.

(४) अधिनियमाच्या कलम ४अ च्या पोट-कलम (२क) अन्वये कुटुंबवेतन मिळण्यास हक्कदार असलेल्या मृत विधवा किंवा यथास्थिती विधूर त्यांच्या अज्ञान मुलाचा पालक त्या अज्ञान मुलांच्यावतीने प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय, यांच्याकडे जोडपत्र नऊ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या '' कुटुंबावेतन अर्जाच्या नमुन्यात '' अर्ज करील.

(५) ज्याबाबतीत या नियमान्वये अज्ञान मुलांना कुटुंब वेतन मंजूर करण्यात आले असेल त्या बाबतीत, पालकाने जोडपत्र दहा मधील क्षतिपूर्ति बंधपत्र करून दिल्यानंतर आणि पालकत्वाबाबत प्रतिज्ञापत्र सादर केल्यानंतर असे कुटुंबवेतन हे अज्ञान मुलांच्यावतीने पालकांस देय असेल.

**१४. निवृत्तिवेतनाचे दुसऱ्या कोषागाराकडे हस्तांतरण.**---(१) अधिदान व लेखा अधिकाऱ्यास/कोषागार अधिकाऱ्यास निवृत्तिवेतनधारकाने केलेल्या अर्जावरून त्याच्या निवृत्तिवेतनासंबंधातील प्रदानाचे, महालेखाकाराच्या हस्तक्षेपाशिवाय, त्याच लेखापरीक्षा मंडळातील महाराष्ट्र राज्याच्या दुसऱ्या कोषागाराकडे हस्तांतरण करता येईल.

(२) राज्यात, परंतु लेखापरीक्षा मंडळाबाहेर दुसऱ्या कोषागाराकडे निवृत्तिवेतनाचे हस्तांतरण करण्यात यावयाचे असेल त्या बाबतीत अधिदान व लेखा अधिकारी/कोषागार अधिकारी निवृत्तिवेतन प्रदान आदेशाचे

दोन्ही भाग सरळ लेखापरीक्षा कार्यालयाकडे पाठवील, निवृत्तिवेतनाच्या हस्तांतरणासंबंधीचा अर्ज मिळाल्यावर, निवृत्तिवेतन प्रदान आदेश मूळ लेखापरीक्षा कार्यालयाने काढण्याऐवजी लेखापरीक्षा कार्यालय अशा हस्तांतरणासंबंधातील निवृत्तिवेतन प्रदान आदेश नव्याने काढील.

(३) जेव्हा निवृत्तिवेतनधारक महाराष्ट्र राज्याबाहेरील आपल्या निवृत्तिवेतनाच्या प्रदानासंबंधातील हस्तांतरणास अधिदान व लेखा अधिकारी/कोषागार अधिकारी यांजकडे अर्ज करील तेव्हा, अधिदान व लेखा अधिकारी/कोषागार अधिकारी निवृत्तिवेतन प्रदान आदेशाचे दोन्ही भाग महालेखाकार, महाराष्ट्र यांच्याकडे पाठवील. अशा निवृत्तिवेतन प्रदान आदेशांसोबत निवृत्तिवेतनधारकाच्या नमुन्यादाखलच्या सह्या किंवा यथास्थिती आंगठ्याचे ठसे असलेल्या दोन चिठ्ठ्याही (स्लिपाही) महालेखाकार, महाराष्ट्र यांजकडे पाठविण्यात येतील. संबंधित कागदपत्रे मिळाल्यावर, महालेखाकार ज्या राज्याचे असे कोषागार असेल त्या राज्याच्या महालेखाकारास निवृत्तिवेतनाचे प्रदान करण्यासंबंधी कळवील.

(४) निवृत्तिवेतनधारक निवृत्तिवेतनाचे हस्तांतरण महाराष्ट्र राज्यातील किंवा भारताच्या कोणत्याही इतर राज्यातील एका कोषागाराकडून दुसऱ्या कोषागाराकडे, होण्यासंबंधात अर्ज करील अशा सर्व प्रकरणी, निवृत्तिवेतनधारक माहितीसाठी अर्जाची एक प्रत प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांना पाठवील. तसेच या बाबतीत अधिदान व लेखा अधिकारी/कोषागार अधिकारी, तसेच लेखापरीक्षा अधिकाऱ्याने पाठविलेल्या पत्राची एक प्रत माहितीसाठी महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय यांना पाठवील.

**१५. सर्वसाधारण.**––(१) पहिल्या वेळच्या गटाच्या (लॉट) निवृत्तिवेतनासंबंधातील सेवेची पडताळणी ही, नियम ७ मध्ये दर्शविलेल्याप्रमाणे अभिलेखाची व्यवस्था झाल्यानंतरच करण्यात येईल. त्यानंतर, प्रत्येक सदस्यासाठी तो/ती निवडून आल्याबरोबर किंवा नामनिर्दिष्ट करण्यात आल्याबरोबर अवर सचिवाकडून यथोचितरित्या अनुप्रमाणित करण्यात येणारे पूर्ववृत्तपत्रक (हिस्टरी कार्ड) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडून सुरू करण्यात येईल व ते ठेवण्यात येईल. या पत्रकांचे प्रत्येक वर्षाच्या फेब्रुवारीच्या १ व १५ तारखेच्या दरम्यानच्या कालावधीत नवीकरण व अनुप्रमाणन करण्यात येईल.

(२) याद्या तयार करण्यात आल्याबरोबर विधानमंडळ, सचिवालय त्यासह निवृत्तिवेतनाचे नमुने प्रत्येक माजी विधानमंडळ सदस्यास किंवा माजी विधानपरिषद सदस्यास पाठवील. यापुढे अर्जाचा नमुना सभागृह विसर्जित करण्यात आल्यानंतर दोन आठवड्यांच्या आत पाठविण्यात येईल.

(३) यथोचितरित्या भरलेला निवृत्तिवेतनासंबंधातील अर्जाचा नमुना महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालयास मिळाल्याबरोबर, अर्जदारास त्याची पोहोच पाठविण्यात येईल.

(४) सर्वसाधारणतः अर्जाची छाननी, तो मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत करण्यात येईल व कोणताही मजकूर, भरावयाचा राहिला असल्यास अर्जदारास तो पूर्ण करण्याबद्दल कळविण्यात येईल.

(५) निवृत्तिवेतन उप शाखा मिळालेल्या आणि निकालात काढलेल्या निवृत्तिवेतनविषयक प्रकरणांचा अहवाल प्रत्येक आठवड्यात सोमवारी उप सचिवांना सादर करील. हा प्रगती अहवाल प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, यांना दर पंधरवड्याला (म्हणजे दुसऱ्या व चौथ्या सोमवारी) सादर करता येईल.

## जोडपत्र एक

(नियम ३ पहा)

## निवृत्तिवेतनासाठी अर्ज

(माजी वि.स.स./वि.प.स. यांनी दोन प्रती सादर कराव्या)

प्रेषक

श्री./श्रीमती/कुमारी ..........................................................

माजी वि.स.स./वि.प.स.

प्रति,

प्रधान सचिव,

महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई/नागपूर.

**विषय.**—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ या अन्वये निवृत्तिवेतन मंजूर करणे.

महोदय,

उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३ अनुसार मला, विधानसभा/परिषद सदस्य म्हणून सेवा केलेल्या खालील कालावधीच्या बाबतीत निवृत्तिवेतन मिळण्याचा हक्क आहे :—

| अनु. क्रमांक (१) | मतदारसंघाचे नाव (२) | सभागृहाचे नाव (३) | पासून (४) | पर्यंत (५) |
|---|---|---|---|---|
| अ-१ | .......................... | मुंबई/मध्य प्रदेश/हैद्राबाद, विधानसभेत/परिषदेत (१९४६-१९५२). | | |
| १ | .............................. | मुंबई/मध्य प्रदेश/हैद्राबाद, विधानसभेत/परिषदेत (१९५२). | | |
| २ | .............................. | मुंबई विधानसभेत/परिषदेत (राज्यपुनर्रचना अधिनियम, १९५६, अन्वये निर्वाचित). | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| ३ | .............................. | महाराष्ट्र विधानसभा/परिषद (१९५७-१९६२). | | |
| ४ | .............................. | महाराष्ट्र विधानसभा/परिषद (१९६२-१९६७). | | |
| ५ | .............................. | महाराष्ट्र विधानसभा/परिषद (१९६७-१९७२). | | |
| ६ | .............................. | महाराष्ट्र विधानसभा/परिषद (१९७२-१९७८). | | |
| ७ | .............................. | महाराष्ट्र विधानसभा/परिषद एकूण कालावधी. | | |

मी शेवटचे वेतन .............................. या कोषागारातून घेतले आहे.

मी विधानसभा/परिषद सदस्यत्त्वाचा राजीनामा दिनांक .......................... ला दिला आहे. राजीनाम्याचे कारण ...................................................... हे होते.

२. मला निवृत्तिवेतन मंजूर करण्यास कृपया कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती आहे. माझे निवृत्तिवेतन ...................................................... येथील शासकीय कोषागारातून/अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून घेण्याची माझी इच्छा आहे.

३. मी प्रथमश्रेणी दंडाधिकारी/केंद्र शासनाचा किंवा राज्य शासनाचा प्रथमश्रेणी अधिकारी/महाराष्ट्र विधानमंडळाचे विद्यमान सदस्य यांनी रीतसर साक्षांकित केलेले खालील कागदपत्र सोबत जोडत आहे :—

(एक) तीन नमुन्यांच्या सह्या.

(दोन) परिपत्र (पासपोर्ट) आकाराचा अगदी अलिकडच्या काळातील छायाचित्रांच्या तीन प्रती.

४. माझा सध्याचा पत्ता ..........................................................................................

.............................................................................. असा आहे.

माझा कायमचा पत्ता ..............................................................................................

.............................................................................. असा आहे.

५. मी याद्वारे असे जाहीर करतो की,--

(एक) मी निर्वाचित राष्ट्रपतींचे किंवा उप राष्ट्रपतीचे पद किंवा कोणत्याही राज्याच्या राज्यपालाचे पद किंवा एखाद्या संघराज्य क्षेत्राच्या प्रशासकाचे पद धारण करीत नाही ; किंवा

(दोन) मी राज्यसभेचा किंवा लोकसभेचा किंवा एखाद्या राज्याच्या किंवा संघराज्य क्षेत्राच्या विधानसभेचा किंवा एखाद्या राज्याच्या कोणत्याही विधानपरिषदेचा सदस्य नाही ; किंवा

(तीन) केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य सरकारच्या किंवा केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य सरकारच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही महामंडळाच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली वेतनावर माझी सेवानियुक्ती झालेली नाही किंवा अशा सरकारकडून, महामंडळाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून मी, कोणतेही पारिश्रमिक घेतलेले नाही ; किंवा

(चार) मी .................................................. चे पद धारण करीत आहे
किंवा .................................................................. चा सदस्य आहे
किंवा ........................................................................ म्हणून
किंवा .................................................. मध्ये माझी सेवानियुक्ती झाली आहे ;
आणि मला दरमहा एकूण .................................... रुपये पारिश्रमिक मिळते ;

(पाच) निवृत्तिवेतनाची अतिरिक्त रक्कम मला दिल्याचे लेखापरीक्षकांच्या किंवा विधानमंडळ सचिवालयाच्या निदर्शनास येईल तेव्हा मी अशी अतिरिक्त रक्कम परत करण्याची जबाबदारी पत्करतो.

नाव (ठळक अक्षरात) ........................................

ठिकाण

दिनांक

आपला विश्वासू,

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्र. .................................. निवृत्तिवेतन/ दिनांक

आवश्यक त्या कार्यवाहीसाठी निवृत्तिवेतन पडताळणी शाखेकडे अग्रेषित.

कक्ष अधिकारी,

## निवृत्तिवेतन पडताळणी शाखा

दिनांक :

असे प्रमाणित करण्यात येत आहे की, श्री./श्रीमती/कु. ..................................................................
यांनी विधानमंडळाचा सदस्य म्हणून खाली दिलेल्या कालावधीसाठी सेवा केली आहे :—

(१) पासून .................................. पर्यंत ..................................

(२) पासून .................................. पर्यंत ..................................

(३) पासून .................................. पर्यंत ..................................

आणि त्यांना दरमहा .................................. रुपयांचे निवृत्तिवेतन अनुज्ञेय आहे.

अवर सचिव/उप सचिव.

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक .................................. निवृत्तिवेतन/उप शाखा

दिनांक : २००

श्री./श्रीमती/कु. .................................................................................................... यांना .................................. पासून दरमहा .................................................................. रुपयांचे (रुपये .............................................. फक्त) निवृत्तिवेतन मंजूर करण्यात आले आहे.

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

कोषागार/अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून निवृत्तिवेतन देण्याची व्यवस्था करण्यासाठी निवृत्तिवेतन प्रदान आदेश क्र. ........................, दिनांक .................................................... हा, आता महालेखाकार, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.

उप सचिव/अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

# जोडपत्र दोन

(नियम ५ पहा)

**प्रतिज्ञापन**

[महाराष्ट्र विधानमंडळाच्या माजी सदस्याने पहिल्या निवृत्तिवेतनाच्या देयकांबरोबर (बिलांबरोबर) आणि त्यानंतर वर्षामध्ये दोनदा म्हणजे जुलै महिन्यात आणि जानेवारी महिन्यात द्यावयाचे.]

मी असे घोषित करतो की,—

(एक) अध्यक्षांच्या/उपाध्यक्षांच्या पदासाठी माझी निवड झालेली नाही किंवा कोणत्याही राज्याचा राज्यपाल म्हणून किंवा कोणत्याही संघराज्य क्षेत्राचा प्रशासक म्हणून माझी नियुक्ती करण्यात आलेली नाही ; किंवा

(दोन) मी राज्यसभेचा किंवा लोकसभेचा किंवा एखाद्या राज्याच्या किंवा संघराज्य क्षेत्राच्या कोणत्याही विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा सदस्य नाही; किंवा

(तीन) मी केंद्र शासनाकडे किंवा कोणत्याही राज्य शासनाकडे किंवा केंद्र शासनाच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या मालकीच्या असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही महामंडळाकडे किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडे वेतनावर काम करीत नाही किंवा असे शासन किंवा महामंडळ किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याकडून मला अन्य प्रकारे कोणताही मोबदला मिळत नाही; किंवा

(चार) मला केंद्र शासनाकडून/राज्य शासनाकडून/कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून/केंद्र शासनाच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा त्यांच्या नियंत्रणाधीन असलेल्या महामंडळाकडून कोणतेही निवृत्तिवेतन मिळत नाही.

किंवा

(एक) मी, ........................................................................ पद धारण करतो

किंवा, मी ................................ चा सदस्य आहे किंवा* ........................................................

---

* केंद्र शासनाच्या/राज्य शासनाच्या/स्थानिक प्राधिकरणाच्या/केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या/किंवा त्याच्या नियंत्रणाधीन असलेल्या महामंडळाच्या कार्यालयाचे नाव येथे नमूद करावे.

येथे .......................... म्हणून नोकरी करतो आंणि मला मिळणारा एकूण मोबदला रुपये.............................................. इतका आहे.

पूर्ण नाव (ठळक अक्षरात) ..........................................................................................

...............................................

निवृत्तिवेतनधारकाची सही.

ठिकाण ................................................. पत्ता ..........................................................................

.........................................................................................................................................

दिनांक ...................................................................

# जोडपत्र तीन

(नियम ६ **पहा**)

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. निवेयो-१००७/प्र. क्र. १२०, दिनांक १८ ऑगस्ट, २००८ चे **परिशिष्ट** (निवृत्तिवेतनधारकांना निवृत्तिवेतन प्रदान करणाऱ्या/करू इच्छिणाऱ्या बँका)

स्टेट बँक ऑफ इंडिया.

सिंडीकेट बँक

युनायटेड कमर्शियल बँक

देना बँक

बँक ऑफ बडोदा

कार्पोरेशन बँक

अलाहाबाद बँक

इंडियन बँक

बँक ऑफ महाराष्ट्र

बँक ऑफ इंडिया

पंजाब नॅशनल बँक

स्टेट बँक ऑफ हैद्राबाद

सेंट्रल बँक ऑफ इंडिया

आंध्र बँक

युनियन बँक ऑफ इंडिया

ॲक्सीस बँक (युटीआय बँक)

आयसीआयसीआय बँक

एचडीएफसी बँक

आयडीबीआय बँक

फेडरल बँक लिमिटेड

रत्नाकर बँक

कोल्हापूर जिल्हा गव्हर्नमेंट सर्व्हंटस् बँक

कोल्हापूर मराठा को. ऑप. बँक



एचबी १९३५-३अ

श्री. विरशैव को-ऑप. बँक लि.

श्री. बलभीम को-ऑप. बँक लि.

श्री. शाहू को-ऑप. बँक लि.

जळगांव जिल्हा मध्यवर्ती को-ऑप.बँक लि.

मुंबई जिल्हा मध्यवर्ती को-ऑप. बँक लि.

नगर जिल्हा अर्बन मध्यवर्ती को-ऑप. बँक लि.

वर्धा नागरी सहकारी अधिकोष (बँक) मर्यादित.

खामगाव अर्बन को-ऑप. बँक लि.

डेक्कन मर्चंटस् को-ऑप. बँक लि.

सातारा जिल्हा मध्यवर्ती को-ऑप. बँक लि.

जयहिंद को-ऑप. बँक लि.

जनता कमर्शियल को-ऑप. बँक लि.

पुना को-ऑप. रुपी बँक लि.

धुळे जिल्हा गव्हर्नमेंट सर्व्हंटस् को-ऑप. बँक

कोकण मर्कंटाईल को-ऑप. बँक लि. मुंबई

बँक नॅशनल दी पॅरीस

[ निवृत्तिवेतनधारकांना निवृत्तिवेतन प्रदान करण्यासंदर्भात वरील बँकांकडून क्षतिपूर्ती बंधपत्र (Indemnity Bond) घेण्यात येईल.]

# जोडपत्र चार

(नियम ७ **पहा**)

## मूलभूत अभिलेखांची व्यवस्था

(१) १९५२ पासूनच्या सदस्यांची निवड/नामनिर्देशन अधिसूचित करणाऱ्या सर्व **राजपत्रातील** अधिसूचना एकत्रित करणे आणि त्या कालक्रमानुसार फाईल करणे (त्या **राजपत्राच्या** सर्वसाधारण फाईलमध्ये असतील आणि शासकीय अभिलेख कार्यालयातून शोधून काढाव्या लागतील व याच्या प्रती **राजपत्रातून** तयार कराव्या लागतील).

(२) पूर्वीच्या मध्य प्रदेश/हैद्राबाद विधानमंडळात ज्यांनी काम केले आहे अशा माजी सदस्यांच्या बाबतीत, ते त्या सभागृहामध्ये सभासद म्हणून असतील अशा कालावधीचा आवश्यक तो तपशील निश्चित करून घ्यावा लागेल आणि तो अभिलेखामध्ये नमूद करावा लागेल.

(३) दोन्ही सभागृहांच्या सदस्यांच्या वेळोवेळी तयार केलेल्या सर्व मुद्रित सूच्या एकत्रित कराव्या लागतील आणि प्रत्येक सदस्याच्या नावासमोर त्याचा पत्ता समाविष्ट करून त्या कालक्रमानुसार सभागृहनिहाय फाईल्स कराव्या लागतील.

(४) सभागृहामध्ये ज्यांच्यासाठी दुखवट्याचे ठराव मांडण्यात आले असतील अशा सदस्यांची एक सूची संकल्पित करण्यात यावी व त्याची नोंद करण्यात यावी.

(५) ज्या सदस्यांनी राजीनामा दिला असेल अशा सदस्यांची सूची, त्याचा राजीनामा ज्या तारखेपासून अंमलात आला असेल अशा तारखेसह संकलित करण्यात यावी आणि या घटनेची नोंद बृहत्सूचीमध्ये करण्यात यावी. राजीनाम्याची कारणे जर काही असतील तर त्यांची खात्री करून घेण्यात यावी.

(६) ज्या सदस्यांची निवड रद्द असल्याचे घोषित करण्यात आले असेल अशा सदस्यांची एक सूची तयार करण्यात यावी आणि तिची बृहत्सूचीमध्ये नोंद घेण्यात यावी.

(अ) विधानसभेच्या निश्चित मुदती (म्हणजेच १९५२ मध्ये मतदारसंघामधून सदस्याची निवड करण्याचे आदेश प्रथमच्च देण्यात आले होते, त्यानंतर घेण्यात आलेल्या प्रत्येक निवडणुकीनंतर विधानसभा अस्तित्वात आल्याची तारीख व तिच्या विसर्जनाची तारीख) दर्शविणारे एक विवरणपत्र तयार करण्यात यावे व ते अवर सचिव/उप सचिवांकडून अनुप्रमाणित करून घ्यावे.

(ब) विधानपरिषदेच्या सदस्यांच्या बाबतीतदेखील सदस्यांच्या नामनिर्देशनाच्या/आवर्तनाच्या (रोटेशनच्या) तारखा इत्यादी दर्शविणारे वरील प्रकारचे एक विवरणपत्रदेखील तयार करण्यात यावे.

# जोडपत्र पाच

(नियम १० पहा)

## निवृत्तिवेतनधारकाने द्यावयाची सूचना

प्रति
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
कोषागार अधिकारी,

यांस—

**विषय.**—निवृत्तिवेतन थेट बँकांमार्फत देणे.

महोदय,

माझ्या निवृत्तिवेतनाची रक्कम कृपया मी नामनिर्देशित केलेल्या बँकेमार्फत पाठविण्यात यावी, अशी विनंती आहे.

माझ्या निवृत्तिवेतन प्रदान आदेश क्रमांक इत्यादींचा तपशील, बचत बँकेचा खाते क्रमांक तसेच कायमचा पत्ता खालीलप्रमाणे आहे :—

(१) निवृत्तिवेतन प्रदान आदेश क्रमांक ..........................................

(२) मासिक निवृत्तिवेतनाची रक्कम ..........................................

(३) बँकेतील खाते ..........................................

(अ) ठिकाण ..........................................

(ब) बँकेचे नाव व तिची विशिष्ट शाखा ..........................................

(क) एकाच नावावरील विशेष बचत बँक खाते क्र. ..........................................

(४) कायमचा पत्ता ..........................................

..........................................

(५) पोस्टाचा पत्ता ..........................................

नियमांमध्ये विहित केल्याप्रमाणे सहामाही व वार्षिक प्रमाणपत्रे देण्यासंबंधीच्या अटी मला मान्य आहेत.

मी याद्वारे जाहीर करतो की, निवृत्तिवेतन दिले जात असताना मला कोणतीही जादा रक्कम प्रदान करण्यात आली तर त्याची भरपाई करून देण्याची जबाबदारी मी आणि माझे वारस व उत्तराधिकारी यांच्यावर राहील.

माझ्या एकाच नावावरील बचत बँक खात्यामध्ये माझे निवृत्तिवेतन जमा करण्यासाठी माझ्या वतीने माझे निवृत्तिवेतन घेण्यास मी .......................................... बँकेस याद्वारे प्राधिकृत करीत आहे आणि आणखी असेही प्राधिकृत करीत आहे की, माझ्या वतीने घेतलेल्या माझ्या निवृत्तिवेतनाच्या रकमेची बँकेने दिलेली पावती ही कायदेशीर पावती असल्याचे मानण्यात यावे.

आपला,

ठळक अक्षरात संपूर्ण नाव ..............................................................................................
ठिकाण ............................................
दिनांक ..............................................

..............................................

निवृत्तिवेतनधारकाची सही
माजी विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य.

---

**पोच पावती**

श्री./श्रीमती ............................................................ यांच्याकडून ........................................
.......................................................................................... बँकेमार्फत निवृत्तिवेतन देण्याबद्दलची
दिनांक ............................................ ची सूचना मिळाली. निवृत्तिवेतन प्रदान आदेशाचा क्रमांक
...................... आहे.

..............................................

अधिदान व लेखाधिकारी/कोषागार अधिकारी.

# जोडपत्र सहा

[नियम १३-अ (१) **पहा**]

## कुटुंबवेतनासाठी करावयाचा नामनिर्देशनाचा नमुना

मी, ..............................................................................................................................

वि.स.स./वि.प.स. माझा मृत्यू झाल्यास कुटुंबवेतन मिळण्यासाठी याद्वारे माझ्या पत्नी/पतीला नामनिर्देशित करीत आहे.

पत्नीचे/पतीचे नाव : ..........................................................................................................

पत्नीची/पतीची जन्मतारीख : .............................................................................................

पत्ता : ..............................................................................................................................

..............................................................................................................................

ठिकाण : ..................................................          ..................................................

दिनांक : ..................................................          (सदस्याची सही)

साक्षीदारांच्या सह्या—

(१) ......................................................................................................

(२) ......................................................................................................

पती/पत्नी म्हणून दोघांचा एकत्रित फोटो (३×२ इंच) यासोबत जोडत आहे.

# जोडपत्र सात

[ नियम १३-अ (२) व १३-ब (२) **पहा** ]

## मृत सदस्याच्या विधवेस/विधुरास कुटुंबवेतन देण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

(सहपत्रासहित दोन प्रती सादर कराव्यात)

प्रेषक,

श्रीमती/श्री. ..............................................................................................

दिवंगत श्री./श्रीमती .................................................................... माजी वि.स.स./वि.प.स.

यांची विधवा/याचा विधुर

प्रति,

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन,
मुंबई ४०० ०३२.

**विषय.**—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ याच्या कलम ४-अ अन्वये कुटुंबवेतन मंजूर करणे.

महोदय,

महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ च्या कलम ४-अ च्या पोट-कलम २क अनुसार मी, दिवंगत श्री./श्रीमती .............................. माजी वि.स.स./वि.प.स. यांची विधवा/यांचा विधुर म्हणून कुटुंब वेतन मिळण्यास हक्कदार आहे. म्हणून, सदर कुटुंबवेतन मिळण्यासाठी मी पुढील तपशिलांसह अर्ज करीत आहे. कृपया कुटुंबवेतन देण्यासाठी माझा विचार करण्यात यावा.

१. अर्जदाराचे पूर्ण नाव .. ..

२. जन्मतारीख .. ..

३. निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यूचा दिनांक. ..

४. निवृत्तिवेतनधारकाला मिळत असलेल्या निवृत्तिवेतनाची रक्कम.

५. अर्जदाराचा पूर्ण पत्ता .. ..

६. निवृत्तिवेतन प्रदानाचे ठिकाण ..

७. सहपत्रे (अर्जाचे नमुने सोबत जोडले आहेत).

(एक) यथोचितरीत्या साक्षांकित केलेल्या, अर्जदाराच्या दोन नमुना स्वाक्षऱ्या (दोन प्रतित सादर कराव्या).
(दोन) यथोचितरीत्या साक्षांकित केलेल्या, अर्जदाराच्या पासपोर्ट आकाराच्या छायाचित्राच्या सहा प्रती.
(तीन) यथोचितरीत्या साक्षांकित केलेल्या, अर्जदाराच्या डाव्या हाताचा अंगठा व बोटाचे ठसे* असलेल्या दोन चिठ्ठ्या (स्लीप्स).
(चार) यथोचितरीत्या केलेले अर्जदाराचे शारीरिक वर्णन, यात–
(अ) उंची आणि
(ब) हातावर, चेहऱ्यावर किंवा इतरत्र काही शारीरिक खुणा असल्यास नमूद करण्यात यावे (शक्य असल्यास कमीत कमी दोन ठळक खुणा नमूद कराव्यात) (दोन प्रतीत सादर कराव्यात).

८. अर्जदाराची सही किंवा डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा. *

९. साक्षांकन करणाऱ्याचे––

| | नाव | पूर्ण पत्ता | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| (१) | .................................... | ........................ | |
| | .................................... | ........................ | ........................ |
| (२) | .................................... | ........................ | |
| | .................................... | ........................ | ........................ |

१०. साक्षीदार––

| | नाव | पूर्ण पत्ता | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| (१) | .................................... | ........................ | |
| | .................................... | ........................ | ........................ |
| (२) | .................................... | ........................ | |
| | .................................... | ........................ | ........................ |

ठिकाण : ....................................

दिनांकित : ....................................

अर्जदाराची स्वाक्षरी,
....................................

---

**टिप्पणी.**–साक्षांकन हे, दोन राजपत्रित शासकीय अधिकारी किंवा अर्जदार रहात असलेल्या शहर, तालुका किंवा गाव यातील दोन किंवा त्यापेक्षा अधिक मान्यवर अशा व्यक्तींकडून करण्यात आले असले पाहिजे.

* अर्जदार आपली सही करण्याइतपतही साक्षर नसल्यास त्याचे/तिचे ठसे सादर करण्यात यावे.

सहपत्रे--

(१) **नमुन्याची स्वाक्षरीची चिठ्ठी (स्लीप)--**

(१) ....................................................................................................

(२) ....................................................................................................

(३) ....................................................................................................

यांची नमुना स्वाक्षरी.

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त नमुना स्वाक्षरी माझ्या समक्ष करण्यात आली.

स्वाक्षरी ..........................................................................

नाव ................................................................................

पदनाम ..........................................................................

दिनांकित ........................

(२) **कुटुंब निवृत्तिवेतनधारकाचे छायाचित्र--**

कुटुंब निवृत्तिवेतनधारकाची स्वाक्षरी ..........................................................................

प्रमाणित करण्यात येते की, सदर स्वाक्षरी आणि छायाचित्र

.................................................................................................... यांचे आहे.

स्वाक्षरी ..........................................................................

नाव ................................................................................

दिनांकित : ........................

पदनाम ..........................................................................

(३) **अंगठा व बोटांचे ठसे असलेले कार्ड/पत्रक–**

| करंगळी | अनामिका | मधले बोट | तर्जनी | अंगठा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, अंगठा व बोटांचे ठसे हे ......................................................
...................................................... यांच्या डाव्या हाताचे आहेत.

स्वाक्षरी ......................................................

नाव ......................................................

दिनांक ........................ पदनाम ......................................................

(४) **व्यक्तीचे शारीरिक वर्णन–**

(१) ऊंची

(२) हात, चेहरा इत्यादी ठिकाणी असलेल्या शारीरिक खुणा .

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त ओळख चिन्हे ......................................................
...................................................... यांची आहेत.

स्वाक्षरी ......................................................

नाव ......................................................

दिनांक : ........................ पदनाम ......................................................

## जोडपत्र आठ

[नियम १३-क (१) पहा]

## कुटुंबवेतनासाठी नामनिर्देशन करण्याचा नमुना

मी, ........................................................ कै. ........................................................ माजी वि.स.स./वि.प.स. यांची विधवा/विधुर, माझा मृत्यू झाल्यास कुटुंब वेतन मिळण्यासाठी याद्वारे माझ्या अज्ञान अपत्यास/अपत्यांना नामनिर्देशित करीत आहे.

अपत्ये व अपत्ये यांची नावे (१) ........................................ जन्मतारीख ..............................

व जन्मतारीख

(२) ........................................ जन्मतारीख ..............................

पत्ता : ........................................................................................................................

........................................................................................................................

........................................................................................................................

..............................................

(विधानमंडळाच्या माजी सदस्यांच्या विधवेची/विधुराची सही)

ठिकाण : ..............................................

दिनांक : ..............................................

साक्षीदारांच्या सह्या–

(१) ..........................................................................................

(२) ..........................................................................................

अज्ञान अपत्यासह एकत्रित फोटो (३×२ इंच) खाली जोडत आहे.

# जोडपत्र नऊ

[ नियम १३-क (४) **पहा** ]

## मृत कुटुंबवेतनधारक विधवेच्या/विधुराच्या अज्ञान अपत्यांना कुटुंबवेतन मंजूर करण्यासाठी त्यांच्या पालकांनी करावयाच्या अर्जाचा नमुना

(सहपत्रासहित दोन प्रती सादर कराव्यात)

प्रेषक

श्री./श्रीमती ..............................................................................................................

(मृत व्यक्तीच्या पश्चात अज्ञान अपत्य किंवा अपत्ये असतील तर त्यांचा पालक)

प्रति,

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई ४०० ०३२.

**विषय.**—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ च्या कलम ४अ च्या पोट-कलम (२क) अन्वये कुटुंबवेतन मंजूर करण्याबाबत.

महोदय,

मृत कुटुंबवेतनधारक श्री./श्रीमती .................................................................. यांचा/यांची अज्ञान मुलगा/मुलगी कुमार/कुमारी .................................................................. हा/ही महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन अधिनियम, १९७६ च्या कलम ४अ च्या (२क) अनुसार कुटुंबवेतन मिळण्यास हक्कदार आहे. मी त्यांचा पालक असून सदर कुटुंबवेतन त्याला/तिला देण्यात यावे म्हणून मी, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन नियम, १९७७ च्या १३क च्या पोट-नियम (४) अन्वये पुढील तपशिलासह अर्ज करीत आहे. कृपया त्याला/तिला कुटुंबवेतन देण्याबाबत विचार करण्यात यावा :—

१. पालकाचे पूर्ण नाव :

२. महाराष्ट्र विधानमंडळाच्या मृत माजी सदस्यांच्या हयात अपत्यांची नावे व वय–

| अ. क्र. | नाव | मृत व्यक्तीशी असलेले नाते | इसवीसनानुसार जन्मदिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |

३ कुटुंबवेतनधारकाच्या मृत्यूचा दिनांक . .

४. मृत माजी सदस्याचा मतदारासंघ . .

५. पालकांचा जन्मदिनांक आणि मृत कुटुंबवेतनधारकाशी असलेले त्याचे नाते . .

६. कुटुंबवेतनाधारकास मृत्यूच्या दिनांकास मिळत असलेली कुटुंबवेतनाची रक्कम . .

७. अर्जदाराचा पूर्ण पत्ता . .

८. कुटुंबवेतन प्रदान करण्याचे ठिकाण (शासकीय कोषागार) . .

(पालकाची सही)

**सहपत्रे** (नमुने सोबत जोडले आहेत),—

(एक) पालकाच्या सहीचे, यथोचितरित्या साक्षांकित करण्यात आलेले दोन नमुने (दोन प्रती सादर करावयात).

(दोन) अज्ञान मुल/मुले यांच्या पारपत्र आकाराच्या छायाचित्राच्या यथोचितरित्या साक्षांकित करण्यात आलेल्या दोन प्रती.

(तीन) अर्जदाराच्या डाव्या हाताच्या अंगठ्याचे व बोटांचे ठसे* असलेल्या यथोचितरित्या साक्षांकित करण्यात आलेल्या दोन चिठ्ठ्या.

(चार) (अ) अर्जदाराची उंची आणि (ब) अर्जदाराच्या शरीरावर म्हणजे हात, चेहरा इत्यादींवर कोणत्याही खुणा असल्यास (शक्य असेल तर किमान दोन ठळक खुणा दर्शवाव्यात), त्या खुणा इत्यादी माहिती दर्शविणारे, यथोचितरित्या साक्षांकित करण्यात आलेले शारीरिक वर्णन (दोन प्रती सादर कराव्यात).

(पाच) जन्म दिनांक दर्शविणारा मुलाचा वयाचा दाखला (मूळप्रत व दोन साक्षांकित प्रती). हा वयाचा दाखला नगरपालिका प्राधिकारी किंवा ग्रामपंचायत किंवा मूल एखाद्या मान्यताप्राप्त शाळेत शिकत असेल तर त्या शाळेचा प्रमुख, यांच्याकडून घेतलेला असावा (ज्या मुलाच्या किंवा मुलांचा जन्मदिनांकाचा तपशील कार्यालय प्रमुखांकडे उपलब्ध नसेल अशा मुलांच्या बाबतीत ही माहिती सादर करण्यात यावी).

---

**टीप**.—हे साक्षांकित अर्जदार ज्या शहरात, तालुक्यात किंवा गावात राहत असेल त्या शहरातील, तालुक्यातील किंवा गावातील दोन राजपत्रित शासकीय अधिकाऱ्यांनी अथवा दोन किंवा अधिक प्रतिष्ठित व्यक्तींनी करणे आवश्यक आहे.

*अर्जदार स्वाक्षरी करण्याइतपत देखील साक्षर नसेल अशा बाबतीत सादर कराव्यात.

(१) **पालकाच्या सहीच्या नमुन्याची चिठ्ठी–**

...................................................................................यांच्या सहीचा नमुना

(१) ........................................................................

(२) ........................................ ............................

प्रमाणित करण्यात येते की, वरील नमुना सही माझ्या समक्ष करण्यात आली.

सही ........................................................................

नाव ........................................................................

पदनाम ....................................................................

दिनांक ....................................

(२) **अज्ञान मुल/मुले यांचे छायाचित्र**

**पालकाचे छायाचित्र**

प्रमाणित करण्यात येते की, वरील छायाचित्र ..................................................

...........................................................................................यांची आहेत.

सही ..................................................... सही.............................................

नाव ..................................................... नाव ............................................

पदनाम ................................................. पदनाम ........................................

दिनांक ................................................

(३) **अंगठा व बोटे यांच्या ठशांचे कार्ड (पालकाच्या)—**

| करंगळी | अनामिका | मधले बोट | तर्जनी | अंगठा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(अ) साक्षांकित करणाऱ्या व्यक्ती

| | नाव | पूर्ण पत्ता | सही |
|---|---|---|---|
| (एक) | ..................................... | ..................................... | ..................................... |
| (दोन) | ..................................... | ..................................... | ..................................... |

(ब) साक्षीदार--

| | नाव | पूर्ण पत्ता | सही |
|---|---|---|---|
| (एक) | ..................................... | ..................................... | ..................................... |
| (दोन) | ..................................... | ..................................... | ..................................... |

प्रमाणित करण्यात येते की, डाव्या हाताच्या अंगठ्याचे व बोटांचे ठसे .............................................
...............................................................................यांचे आहेत.

सही .............................................

नाव .............................................

पदनाम .............................................

दिनांक ..............................

(४) **शारीरिक वर्णन**–

(एक) उंची

(दोन) शरीरावर म्हणजे हात, चेहरा इत्यादीवर कोणत्याही खुणा असल्यास, त्या खुणा

प्रमाणित करण्यात येते की, वरील ओळखचिन्हे...........................................................
............................................. ..............................याची आहेत.

सही .............................................

नाव .............................................

पदनाम .............................................

दिनांक ..............................

## जोडपत्र दहा

[नियम १३-क (५) पहा]

### अज्ञान अपत्यांच्या वतीने कुटुंबवेतनाच्या रकमेची मागणी करणाऱ्या व्यक्तीने द्यावयाच्या क्षतिपूर्ती बंधपत्राचा नमुना.

हा विलेख एका पक्षी ........................................................ (येथे अज्ञान अपत्यांना लागू होणारा व्यक्तिगत कायदा नमूद करावा.) पालकत्व कायदा लागू होणारा १८ वर्षे वयाखालील अज्ञान (अज्ञान व्यक्तीचे पूर्ण नाव) ........................................................ ........................................................ याचा वास्तविक पालक ........................................................ ........................................................ (येथे वास्तविक पालकाचे नाव आणि त्याचे/तिचे अज्ञान अपत्याशी असलेले नाते नमूद करावे.) (यात यापुढे त्यांचा "बंधित व्यक्ती" असा निर्देश केला असून त्या संज्ञेच्या संदर्भामधून किंवा अर्थामधून वगळलेले नसल्यास किंवा तिच्या संदर्भास किंवा अर्थास प्रतिकूल नसल्यास, त्या संज्ञेत त्याचे/तिचे वारसदार, मृत्यूपत्र व्यवस्थापक आणि प्रशासक यांचा समावेश होतो असे मानले जाईल) आणि दुसऱ्या पक्षी, महाराष्ट्राचे राज्यपाल (यात यापुढे त्यांचा "शासन" असा निर्देश केला असून त्या संज्ञेच्या संदर्भामधून किंवा अर्थामधून वगळलेले नसल्यास किंवा तिच्या संदर्भास किंवा अर्थास प्रतिकूल नसल्यास, त्या संज्ञेत त्याचे उत्तराधिकारी आणि अभिहस्तांकिती यांचा समावेश होतो असे मानले जाईल.)

यांच्यामध्ये दिनांक ........................................................ रोजी करण्यात आला.

ज्याअर्थी श्री./श्रीमती ........................................................ (मृत व्यक्तीचे नाव) हे/ह्या, त्यांच्या मृत्यूसमयी महाराष्ट्र विधानमंडळाचा सदस्य होते/होत्या ;

आणि ज्याअर्थी, उक्त, श्री./श्रीमती ........................................................ (मृत व्यक्तीचे नाव) (हयात यापुढे ज्यांचा निर्देश " मृत " असा करण्यात आला आहे) हे / ह्या, दिनांक ........................ रोजी ................................ येथे मृत्यू पावले/पावलेल्या असून त्यांनी मृत्यूपत्र केलेले आहे/नाही आणि त्यांच्या पश्चात ................................ (येथे सज्ञान मुलांची नावे द्यावीत) व उक्त, १८ वर्षे वयाखालील ........................ (अज्ञान मुलाचे/मुलीचे नाव) (यात यापुढे ज्याचा/जिचा निर्देश "अज्ञान" असा करण्यात आला आहे) ही, ........................................................ (मृत व्यक्तीचा धर्म) ह्या, मृत व्यक्तीला लागू असणाऱ्या कायद्यानुसार ........................................ एकमेव वारस आहेत ;

आणि ज्याअर्थी, बंधित व्यक्ती ही, मृत व्यक्तीची ........................................................ (येथे मृत व्यक्तीशी, वास्तविक पालकाचे असलेले नाते नमूद करावे) असून, ........................................ या (येथे अज्ञान व्यक्तीला लागू असणारा व्यक्तिगत कायदा नमूद करावा.) अज्ञान व्यक्तीला लागू असलेल्या पालकत्व कायद्यानुसार तिचे वास्तविक पालक आहे व तिने अज्ञान व्यक्तीचा व तिच्या मालमत्तेचा स्वेच्छेने स्वत:कडे प्रभार घेतला आहे ;

आणि ज्याअर्थी, संबंधित नियमांन्वये, मृत व्यक्तीचा/व्यक्तीची अज्ञान मुलगा/मुलगी म्हणून स अज्ञान मुलाला/मुलीला दिनांक .................................................................................. ला सुरू होणाऱ्या व दिनांक ......................................... ला संपणाऱ्या कालावधीसाठी दरमहा रु. ........................... एवढे कुटुंबवेतन अनुज्ञेय आहे (हा दिनांक हा, ज्या दिवशी अज्ञान व्यक्ती वयाची अठरा वर्षे पूर्ण करते तो दिनांक आणि जिचा स्वतःचा आणि तिच्या मालमत्तेचा किंवा दोहोंचा प्रभार घेण्यासाठी न्यायालयाने पालक नियुक्त केला असेल किंवा ज्याच्या मालमत्तेची देखरेख करण्याचे काम पाल्याधिकरणाकडून हाती घेण्यात आले आहे अशी अज्ञान व्यक्ती ज्या दिनांकाला वयाची २१ वर्षे पूर्ण करते तो दिनांक किंवा मुलीच्या बाबतीत, तिच्या विवाहाचा दिनांक असावा) (हा भाग केवळ अज्ञान मुलींच्या बाबतीत लागू होतो) यापैकी जो आधीचा असेल तो दिनांक असावा ;

आणि ज्याअर्थी, अज्ञानाचा पालक म्हणून बंधित व्यक्तीने वर म्हटल्याप्रमाणे अज्ञानाला देय व प्रदेय असलेले कुटुंबवेतन अज्ञानाकरता व त्याच्या वतीने स्वतःला देण्यात यावे अशी विनंती केल्यावर, यात यापुढे दिलेल्या रीतीने बंधित व्यक्तीने शासनाच्या नावे क्षतिपूर्ति बंधपत्र करून दिल्यानंतर शासनाने तसे करण्याचे मान्य केले आहे ;

आणि ज्याअर्थी, हा अधिलेख या गोष्टीस साक्ष आहे की, उक्त कराराच्या अनुरोधाने आणि मृताचा अज्ञान मुलगा/मुलगी म्हणून अज्ञानाला देय व प्रदेय असलेले कुटुंबवेतन, अज्ञानाचा वास्तविक पालक म्हणून बंधित इसमाला देण्यास बंधित इसमाच्या विनंतीवरून शासनाने दिलेली संमती व या कराराचा पूर्व भाग विचारात घेऊन बंधित इसम शासनाशी असा करार करीत आहे की, मृताचा अज्ञान मुलगा/मुलगी म्हणून अज्ञानाला देय व प्रदेय असलेली कुटुंबवेतनाची रक्कम अज्ञानाकरिता व त्याच्या वतीने अज्ञानाचा वास्तविक पालक म्हणून बंधित इसमाला शासनाने वेळोवेळी प्रदान केल्याच्या संबंधात आणि तसेच अज्ञानाकरिता आणि त्याच्या वतीने किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणत्याही अन्य व्यक्तीकडून शासनाविरूद्ध करण्यात येतील त्या सर्व कारवाया, खटले, हक्क मागण्या आणि मागण्या यांच्या संबंधात आणि त्याबाबत शासनाला करावा लागेल किंवा सोसावा लागेल असा सर्व परिव्यय व खर्च व्यय आणि शासनाकडून द्यावी लागेल ती नुकसानीची रक्कम यांच्या संबंधात बंधित इसम यापुढे सदैव शासनाला योग्य व पर्याप्त रीतीने क्षतिपूर्ती करील व करीत राहील व शासनाला विनातोशीस राखील व बंधित इसम याद्वारे असे कबूल करून असे घोषित करीत आहे की, शासनाच्या अन्य कोणत्याही हक्कांना व उपायांना बाध न येता, याखाली देय व प्रदेय असलेली रक्कम यासंबंधान त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याच्या तरतुदीनुसार बंधित इसमाकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल.

याची साक्ष म्हणून बंधित व्यक्तीने यात यापूर्वी प्रथम उल्लेखिलेल्या दिनांकास सही केली.

यात नाव लिहिलेली बंधित व्यक्ती श्री./श्रीमती ..............................................................................
यांनी पुढील व्यक्तींच्या समक्ष सही करून सुपूर्द केले :–

(१) ..............................................................................................................................

(२) ..............................................................................................................................

---

**टीप.**––मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अन्वये हे क्षतिपूर्ति बंधपत्र मुद्रांक शुल्काच्या आकारणीस पात्र आहे.

# माजी विधानमंडळ सदस्यांना विनामूल्य रेल्वे प्रवासाची सुविधा

## महाराष्ट्रातील माजी विधानमंडळ सदस्यांना विनामूल्य रेल्वे प्रवासाची सवलत

**महाराष्ट्र शासन**

**संसदीय कार्य विभाग**

शासन निर्णय क्र. सुविधा-२००५/४९१/प्र.क्र. १३४/दोन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ डिसेंबर, २००७

**वाचा**.—(१) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. १०९७/मुमंस-५३/प्र.क्र. ४७/दोन, दिनांक २३ मार्च २०००.

(२) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. १०९७/मुमंस-५३/प्र.क्र. ४७/दोन, दिनांक २७ मार्च २०००.

(३) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. १०/२०००/२४४/प्र.क्र. ६/दोन, दिनांक ८ जून २०००.

(४) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. १०/२०००/४६४/प्र.क्र. १४/दोन, दिनांक ४ एप्रिल २००१.

**प्रस्तावना :—**

माजी विधानमंडळ सदस्यांना उपरोक्त शासन निर्णयानुसार, विनामूल्य रेल्वे प्रवासाची सवलत अनुज्ञेय असून, सदर प्रवासाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्यासाठी ते सदस्य सध्या ज्या ठिकाणी **वास्तव्य** करीत आहेत, त्या जिल्ह्याचे कोषागार अधिकारी अथवा त्या तालुक्याचे उपकोषागार अधिकारी हे '' **आहरण व संवितरण अधिकारी** (Drawing and Disbursing officer) '' असतील, अशी तरतूद सध्या उपरोक्त संदर्भ क्र. (३) येथील शासन निर्णयान्वये केलेली आहे. प्रस्तुत तरतुदीमध्ये माजी सदस्यांना वास्तव्याच्या ठिकाणीऐवजी ते निवृत्तीवेतन घेत असल्याच्या ठिकाणी प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्यासाठी सुधारणा करण्यासंदर्भात शासनास विनंती करण्यात आली होती व त्या तरतुदीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

संदर्भ क्रमांक (१) येथील शासन निर्णयान्वये माजी विधानमंडळ सदस्यांना राज्यातील प्रवासाकरिता प्रतिवर्षी २०.००० कि. मी. आणि राज्याबाहेर प्रतिवर्षी ५.००० कि. मी. इतक्या मर्यादेपर्यंत एका सोबत्यासह द्वितीय वातानुकुलीत शयनयानाने प्रवास करण्याची सवलत अनुज्ञेय आहे. त्याऐवजी त्यांना एका सोबत्यासह **राज्यात व राज्याबाहेर** रेल्वे प्रवासासाठी एकत्रितपणे विशिष्ट किलोमीटरच्या मर्यादेपर्यंत रेल्वे प्रवासाची सवलत अनुज्ञेय करण्याची बाबही शासनाच्या विचाराधीन होती.

तसेच, प्रस्तुत प्रकरणी काही तांत्रिक अडचणींमुळे, " आहरण व संवितरण अधिकारी " म्हणून उपरनिर्दिष्ट अधिकाऱ्यांऐवजी कोणत्या अधिकाऱ्यास नेमण्यात यावे. ही बाबही विचाराधीन होती. उपरोक्त सुधारणांबरोबरच माजी विधानमंडळ सदस्यांना रेल्वे प्रवासासंदर्भात वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये ज्या सवलती देण्यात आल्या आहेत, त्या सवलती व आता सुधारणा करण्याची सवलती एकत्रित स्वरूपात दर्शवून, त्याबाबतचा एकच शासन निर्णय निर्गमित करण्याची बाबही शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :--**

महाराष्ट्रातील माजी विधानमंडळ सदस्यांना विनामूल्य रेल्वे प्रवासासंदर्भात उपरोक्त शासन निर्णयाद्वारे ज्या विविध सवलती देण्यात आलेल्या आहेत. त्या सवलती बाबतचे व त्या सवलतींपैकी ज्या सवलतींमध्ये उपरोक्त प्रस्तावनेमध्ये उल्लेखिल्यानुसार ज्या सुधारणा प्रस्ताविण्यात आलेल्या आहेत, त्या बाबतचे **एकत्रित आदेश** खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत :--

(१) महाराष्ट्रातील माजी विधानमंडळ सदस्यांना रेल्वेच्या **प्रथम वर्गाने किंवा वातानुकूलीत द्वितीय शयनयानाने विनामूल्य प्रवास** सवलत देण्यात यावी. प्रस्तुत सवलत त्यांना आतापर्यंत एका सोबत्यासह, राज्यातील प्रवासाकरिता प्रतिवर्षी २०,००० किलोमीटर्स इतक्या आणि राज्याबाहेर प्रतिवर्षी ५.००० किलोमीटर्स इतक्या मर्यादेपर्यंत देण्यात येत होती. सदर सुविधा **आता राज्यात व राज्याबाहेर अशी एकत्रितपणे दरवर्षी २५.००० कि. मी. इतक्या मर्यादेपर्यंत** अनुज्ञेय करण्यात येत आहे. **प्रस्तुत सुधारिल सवलत सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहे.**

(२) माजी विधानमंडळ सदस्यांनी एका सोबत्यासह प्रथम वर्गाने अथवा वातानुकूलीत द्वितीय शयनयानाने प्रवास करावा आणि त्यांनी केलेल्या प्रवासाच्या खर्चाची प्रतिपूर्ती खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडून करण्यात येईल :--

(अ) माजी सदस्यांनी **प्रथम स्वतः अथवा एका सोबत्यासह, प्रस्तुत रेल्वे प्रवासाच्या सवलतीचा लाभ घ्यावा.** अनुज्ञेय वर्गाच्या प्रवासाची तिकीटे उपलब्ध नसल्यामुळे, निम्न श्रेणीच्या वर्गाने सदस्यांनी प्रवास केल्यास, ज्या वर्गाने त्यांनी प्रत्यक्ष प्रवास केला असेल, त्या वर्गाच्या भाड्यांची प्रतिपूर्ती त्यांना अनुज्ञेय राहील.

(ब) **माजी सदस्यासोबतच त्याच्या सोबत्याने प्रवास करावा.** परंतु, त्या सोबत्याने केलेल्या प्रवासाची परिगणना सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या किलोमीटर्सच्या मर्यादेमध्ये करण्यात येऊ नये.

(क) प्रस्तुत प्रवास सवलतीच्या प्रतिपूर्तीची मागणी माजी सदस्यांनी प्रवास केल्याच्या तारखेपासून **तीन महिन्यांच्या आत** करावी सदरहू मागणी सादर करतांना माजी सदस्यांनी सोबत जोडलेल्या **विवरणपत्रातील माहिती** संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी अथवा संबंधित तालुक्याचे उप कोषागार अधिकारी यांच्याकडे सादर करावी. व ती मागणी करताना **प्रवासाचे मूळ तिकीट** सादर करावे. (यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा केली आहे.)

३. माजी सदस्यांना रेल्वे प्रवास सवलतीच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्यासाठी ते सदस्य सध्या ज्या ठिकाणी **वास्तव** करीत आहेत. त्या जिल्ह्याचे कोषागार अधिकारी अथवा त्या तालुक्याचे उप कोषागार अधिकारी हे आहरण व सवितरण अधिकारी (Drawing and Disbursing officer) असतील अशी सध्या तरतूद आहे. या तरतुदीमध्ये आता खालीलप्रमाणे **सुधारणा** करण्यात येत आहे :—

माजी विधानमंडळ सदस्यांना रेल्वे प्रवास सवलतीच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्यासाठी संबंधित सदस्य ज्या ठिकाणी त्यांचे **निवृत्तीवेतन घेत असतील, त्या तालुक्याचे महसूल विभागाकडील संबंधित '' उप विभागीय अधिकारी (Sub Divisional Officer) '' यांना या आदेशाद्वारे '' आहरण व संवितरण अधिकारी '' म्हणून दिनांक १ एप्रिल २००८ पासून घोषित करण्यात येत आहे व ते आहरण व संवितरण अधिकारी म्हणून दिनांक १ एप्रिल २००८ पासून काम पाहतील.** त्याकरिता माजी विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य यांनी त्यांच्या रेल्वे प्रवास खर्च प्रतिपूर्तीची देयके उप विभागीय अधिकाऱ्याकडे सादर करावी. उप विभागीय अधिकारी कार्यालयाने ती देयके सध्याच्या विहित पद्धतीनुसार कोषागारात सादर करावी. दिनांक ३१ मार्च २००८ पर्यंत उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्यानुसार विद्यमान आहरण व संवितरण अधिकारी कार्यरत राहतील.

४. माजी विधानमंडळ सदस्यांनी २५,००० कि.मी. च्या मर्यादेमध्ये राज्यात व राज्याबाहेर रेल्वेऐवजी विमानाने प्रवास केल्यास, त्यांना कोणत्याही रेल्वेच्या अनुज्ञेय असलेल्या रेल्वेच्या भाड्याइतकी म्हणजेच प्रथम वर्गाच्या अथवा वातानुकूलीत द्वितीय शयनयानाच्या भाड्याच्या रकमेची प्रतिपूर्ती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडून करण्यात येईल. प्रस्तुत प्रवासाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी करताना त्यांनी विमान प्रवासाचे **मूळ तिकीट** सादर करावे.

५. तसेच माजी सदस्यांना मुंबईतील उपनगरीय रेल्वे गाडीच्या प्रथम वर्गातून प्रवास करण्याकरिता उपरोक्त दिनांक ४ एप्रिल २००१ च्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय असलेली मासिक अथवा त्रैमासिक सीझन तिकीटाची प्रवास सवलत आता प्रस्तुत शासन निर्णयान्वये विहित केलेल्या प्रतिवर्षी किलोमीटरच्या मर्यादेच्या अधीन राहून देण्यात यावी. त्यांनी सीझन तिकीटाची सवलत घेऊन प्रवास केल्यानंतर, किलोमीटरची परिगणना करताना, संबंधित सदस्यांनी प्रवास केलेल्या अंतरासाठी प्रथम वर्गाच्या तिकीटासाठी आणि सीझन तिकीटासाठी रेल्वेने ज्या पटीमध्ये प्रवासाचा दर विहित केला आहे. त्याचपटीने किलोमीटरची परिगणना करण्यात यावी व तेवढे किलोमीटर अनुज्ञेय किलोमीटरमधून वजा करावे.

**उदाहरणार्थ,** मुंबई ते कसारा या प्रवासाच्या पहिल्या वर्गाच्या तिकीटाचा दर रुपये १८० इतका व मासिक सीझन तिकीटाचा दर रुपये १,३८० इतका आणि त्रैमासिक तिकीटाचा दर रुपये ३,७४५ इतका आहे. सध्याच्या तिकीटाच्या दराच्या तुलनेत, मासिक सीझन तिकीटाचा दर हा साधारणपणे ८ पट व त्रैमासिक सीझन तिकीटाचा दर हा २१ पट आहे. त्यामुळे सदरहू लक्षात घेता. सदस्यांनी केलेल्या प्रवासाचे अंतर हे प्रवासाच्या दराच्या पटीमध्ये परिगणित करावे लागेल. त्यानुसार मुंबई ते कसारा हे अंतर १२१ किलोमीटर असल्यामुळे, संबंधित सदस्याने मासिक सीझन तिकीट काढून त्या अंतराचा प्रवास केला तर त्याने प्रत्यक्ष किलोमीटरच्या अंतराच्या ८ पट, म्हणजेच १२१ कि.मी. ८ पट

९६८ किलोमीटर एवढा प्रवास केला, असे गृहित धरून किलोमीटरची परिगणना करण्यात यावी. तसेच, त्या सदस्याने सदरहू अंतरासाठी त्रैमासिक सीझन तिकीट काढून प्रवास केला. तर त्याने १२१ कि. मी.×२१ पट- २,५४१ किलोमीटर इतके अंतर प्रवास केला असे गृहित धरून किलोमीटरची परिगणना करण्यात यावी व तेवढे किलोमीटर अनुज्ञेय किलोमीटर मधून वजा करावी.

६. प्रस्तुत सुविधेवर होणारा खर्च महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या'' २०११-संसद/राज्य/संघराज्य क्षेत्र विधानमंडळे-०२ राज्य/संघराज्य क्षेत्र विधानमंडळे-१०१ विधानसभा/१०२ विधानपरिषद '' या लेखाशीर्षा खालील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २७६/०७/व्यय-४, दिनांक २५ मे २००७ आणि प्रधान सचिव, वित्तीय सुधारणा, क्रमांक-२२३४, दिनांक ८ नोव्हेंबर २००७ व महसूल व वन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-४४५६/ई-८, दिनांक १७ नोव्हेंबर २००७ अन्वये मिळालेल्या सहमतीने करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

**(चं. स. केंगळे)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

## शासन निर्णय क्रमांक सुविधा-२००५/प्र.क्र. १३४/दोन, दिनांक २७ डिसेंबर, २००७ सोबतचे विवरणपत्र

## माजी विधानमंडळ सदस्यांनी केलेल्या विनामूल्य रेल्वे प्रवासाचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र

| अ. क्र. (१) | माजी विधानमंडळ सदस्याचे नाव व राहण्याचा पत्ता (२) | प्रवास सुरु केल्यचा दिनांक व स्थळ (३) | प्रवास संपल्याचा दिनांक व स्थळ (४) | प्रवास केलेले अंतर (कि.मी. मध्ये) (५) | रेल्वेच्या ज्या वर्गाने प्रवास केला तो वर्ग, भाडे, तिकीट क्रमांक व दिनांक (६) | सदस्याने सोबत्यासह प्रवास केला असल्यास, त्या सोबत्याचा तिकीट क्रमांक व तिकीटाची रक्कम (७) | प्रतिपूर्तीची मागणी सादर केल्याच्या तारखेपर्यंत केलेला एकूण प्रवास (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

मागणी केलेली एकूण रक्कम, रुपये .............................. (अक्षरी रुपये ................................................................ फक्त)

असे प्रमाणित करण्यात येते की, वर नमूद केलेला प्रवास मी स्वतः/सोबत्यासह केला आहे.

सदस्याचे नाव व सही

स्थळ :

दिनांक :

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक सुविधा-२००८/प्र.क्र. २०/दोन,
संसदीय कार्य विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १३ जून २००८

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**विषय :—महाराष्ट्रातील माजी विधानसभा सदस्यांना विनामूल्य रेल्वे प्रवासाची सवलत**

**संदर्भ.**—(१) या विभागाचे समक्रमांकाचे दिनांक ३ जून, २००८ चे पत्र

(२) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे क्र. लेखा/म.वि.स./रेल्वे प्रवास सवलत/२००८, दिनांक ६ जून, २००८

(३) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांचे क्र. २६९६६/मविस./ ह, दिनांक १४ मे २००८ व क्र. २८५९१/मविस/ह, दिनांक ९ जून २००८ ची पत्रे

महोदय,

वरील विषयावरील संदर्भाधिन पत्रे कृपया पहावीत.

२. मुंबई शहरातील माजी विधानमंडळ सदस्य, अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, बांद्रे (पूर्व), मुंबई येथून निवृत्तीवेतने घेतात, असे जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी त्यांच्या संदर्भाधिन पत्रान्वये महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास कळविले आहे.

३. या विभागाच्या दिनांक २७ डिसेंबर २००७ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद ३ मधील तरतुदीनुसार, माजी विधानमंडळ सदस्यांची रेल्वे प्रवासाच्या प्रतिपूर्तीची देयके अदा करण्यासाठी प्रस्तुत सदस्य, ज्या ठिकाणी निवृत्तीवेतन घेत असतील, त्या तालुक्याच्या महसूल विभागातील संबंधित **'' उपविभागीय अधिकारी ''** यांना **'' आहरण व संवितरण अधिकारी ''** म्हणून घोषित करण्यात आले आहे. प्रस्तुत तरतूदीनुसार **मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील माजी विधानमंडळ सदस्य हे मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या क्षेत्रात असलेल्या, अधिदान व लेखा अधिकारी कार्यालयातून निवृत्तीवेतन घेत असल्यामुळे, त्यांची रेल्वे प्रवास सवलत खर्चाची प्रतिपूर्तीची देयके आपल्या कार्यालयातील '' उप विभागीय अधिकारी '' मार्फत अधिदान व लेखा अधिकारी कार्यालयाकडे सादर केली जाणे आवश्यक आहे**

४. तरी, उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता, आपणास असे कळविण्यात येते की, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील माजी विधानमंडळ सदस्यांची रेल्वे प्रवास सवलत खर्चाची प्रतिपूर्तीची देयके आपल्या कार्यालयातील '' **उप विभागीय अधिकाऱ्यामार्फत** '' अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, बांद्रे (पूर्व) मुंबई यांचेकडे अदा करण्यासाठी सादर करण्यात यावीत. तसेच, याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती या विभागास, तसेच, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांना कृपया त्वरित कळविण्यात यावी, ही विनंती.

आपला

सही/-

**(सु. अ. देशपांडे)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

माजी विधानमंडळ सदस्यांना रेल्वे प्रवासाच्या
सुविधेमध्ये वाढ करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**संसदीय कार्य विभाग**

शासन क्रमांक सुविधा २००८/प्र. क्र. १५/दोन,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जुलै २००८.

**वाचा.**–(१) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. १०९७/मुमंस-५३/प्र.क्र. ४७/दोन, दिनांक २३ मार्च २०००.

(२) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. १०९७/मुमंस-५३/प्र.क्र. ४७/दोन, दिनांक २७ मार्च २०००.

(३) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. १०/२०००/२४४/प्र.क्र. ६/दोन, दिनांक ८ जून २०००.

(४) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. १०/२०००/२६४/प्र.क्र. १४/दोन, दिनांक ४ एप्रिल २००१.

(५) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. २००५/प्र.क्र. १३४/दोन, दिनांक २७ डिसेंबर २००७.

## प्रस्तावना

माजी विधानमंडळ सदस्यांना विनामुल्य रेल्वे प्रवासाची सवलत अनुज्ञेय असून संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये माजी विधानमंडळ सदस्यांना राज्यातील प्रवासाकरिता २०,००० कि.मी. आणि राज्याबाहेर ५,००० कि. मी. इतक्या मर्यादेपर्यंत एका सोबत्यासह द्वितीय वातानुकुलित शयन यानाने प्रवास करण्याची सवलत अनुज्ञेय आहे. सदर सवलत उपरोक्त अनुक्रमांक ५ येथील शासन निर्णयान्वये माजी विधानमंडळ सदस्यांना राज्यात व राज्याबाहेर एकत्रितपणे २५,००० कि.मी. इतकी अनुज्ञेय करण्यात आली असून त्यापूर्वीचे सर्व आदेश एकत्रित करण्यात आले आहेत. माजी विधानमंडळ सदस्यांकडून शासनाकडे प्रस्तुत २५,००० कि. मी. च्या मर्यादेमध्ये सुधारणा करण्याची सातत्याने मागणी करण्यात येत होती व त्यानुसार त्यामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

महाराष्ट्रातील माजी विधानमंडळ सदस्यांना विनामुल्य प्रवासासंदर्भात उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये ज्या अटी व शर्तीवर प्रवास सवलत दिली जात आहे. त्याच अटी व शर्तीवर रेल्वे कि. मी. च्या मर्यादेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

माजी विधानमंडळ सदस्यांना रेल्वेच्या प्रथम वर्गाने किंवा वातानुकुलित द्वितीय शयनयानाने वरील प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार एका सोबत्यासह विनामुल्य प्रवास सवलत अनुज्ञेय असून प्रस्तुत सवलत आता प्रती वर्षी राज्यात व राज्याबाहेर एकत्रितपणे एकूण ३५,००० कि.मी. इतक्या मर्यादेपर्यंत अनुज्ञेय करण्यात येत आहे. **ही सुधारित सवलत दिनांक १ मे २००८ पासून लागू करण्यात येत आहे.**

२. माजी विधानमंडळ सदस्यांना मुंबईतील उपनगरीय रेल्वेच्या प्रथम वर्गातून प्रवास करण्याकरिता उपरोक्त दिनांक ४ एप्रिल २००१ च्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय असलेली मासिक/त्रैमासिक सिझन तिकिटाची सवलत, तसेच रेल्वे ऐवजी विमान प्रवासाची सवलत प्रतिवर्षी ३५,००० किलोमीटरच्या मर्यादेत अनुज्ञेय राहील.

३. माजी विधानमंडळ सदस्यांनी प्रतिवर्षी ३५,००० किलोमीटरच्या मर्यादेमध्ये राज्यात व राज्याबाहेर रेल्वे ऐवजी **विमानाने प्रवास** केल्यास, त्यांना कोणत्याही रेल्वेच्या अनुज्ञेय असलेल्या रेल्वेच्या भाड्याइतकी म्हणजेच प्रथम वर्गाच्या अथवा वातानुकूलीत द्वितीय शयनगृहाच्या भाड्याच्या रकमेची प्रतिपूर्ती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडून करण्यात येईल प्रस्तुत प्रवासाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी करताना त्यांनी विमान प्रवासाचे **मूळ तिकीट** सादर करावे.

४. प्रस्तुत सुविधांवर होणारा खर्च " महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या २०११, संसद /राज्य संघराज्य क्षेत्र विधानमंडळे-०२, राज्य/संघराज्य क्षेत्र विधानमंडळे-१०१, विधानसभा-१०२,विधान परिषद " या लेखाशीर्षाखालील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-३३८/व्यय-४/०८, दिनांक २१ जून २००८ अन्वये मिळालेल्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. अ. देशपांडे,**
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

महाराष्ट्रातील माजी विधानमंडळ सदस्यांना
विनामूल्य रेल्वे प्रवासाच्या

**महाराष्ट्र शासन**
**संसदीय कार्य विभाग**

शासन क्रमांक सुविधा २००८/प्र. क्र. ४८/दोन,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ मार्च २००९.

**वाचा.**–(१) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. १०९७/मुमंस-५३/प्र.क्र. ४७/दोन, दिनांक २३ फेब्रुवारी २०००.

(२) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. १०९७/मुमंस-५३/प्र.क्र. ४७/दोन, दिनांक २७ मार्च २०००.

(३) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. १०/२०००/२४४/प्र.क्र. ६/दोन, दिनांक ८ जून २०००.

(४) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. १०/२०००/२६४/प्र.क्र. १४/दोन, दिनांक ४ एप्रिल २००१.

(५) शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग, क्रमांक सुविधा. २००५/प्र.क्र. १३४/दोन, दिनांक २७ डिसेंबर २००७.

**प्रस्तावना**

माजी विधानमंडळ सदस्यांना उपरोक्त शासन निर्णयानुसार, विनामुल्य रेल्वे प्रवासाची सवलत अनुज्ञेय असून सदर प्रवासाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्यासाठी सदस्य सध्या ज्या ठिकाणी **वास्तव्य** करीत आहेत. त्या कोषागार अधिकारी अथवा त्या तालुक्याचे उपकोषागार अधिकारी हे **आहरण व संवितरण अधिकारी** (Drawing and disbursing Officer) असतील. अशी तरतूद सध्या उपरोक्त संदर्भ क्र. (३) येथील शासन निर्णयान्वये केलेली आहे. कोषागार अधिकारी हे कार्यालय प्रमुख आहेत. विभाग प्रमुख नाहीत. तसेच देयके सादर करणे व त्याची छाननी करून मंजूर करणे ही कामे एकाच अधिकाऱ्याकडे सोपविणे उचित नाही. त्यामुळे माजी विधानमंडळ सदस्यांना रेल्वे प्रवास सवलतीच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्यासाठी संबंधित सदस्य ज्याठिकाणी त्यांचे **निवृत्तीवेतन घेत असतील, त्या तालुक्याचे महसूल विभागाकडील संबंधित उपविभागीय अधिकारी** (Sub Divisional Officer) **यांना उपरोक्त अनुक्रमांक ५ येथील आदेशान्वये दिनांक १ एप्रिल २००८ पासून आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले.** त्यानुसार माजी विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य यांनी त्यांच्या रेल्वे प्रवास खर्च प्रतिपूर्तीची देयके त्यांच्या तालुक्याच्या उप विभागीय अधिकाऱ्यांकडे सादर करावी व उप विभागीय अधिकाऱ्यांनी सदर देयके १ एप्रिल २००८ पासून सध्याच्या विहित पद्धतीनुसार कोषागारात सादर करावयाची आहेत. तथापि, प्रस्तुत नवीन पद्धतीनुसार , माजी विधान मंडळ सदस्यांना त्यांची प्रतिपूर्तीची देयके मंजूर होण्यास अडचणी उद्भवत असल्यामुळे, व त्यामध्ये कलापव्यय होत असल्यामुळे प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्यासाठी विद्यमान पद्धतीत सुधारणा करून पूर्वीची पद्धत चालू करण्याबाबत माजी सदस्यांनी शासनास तसेच, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास विनंती केली होती व त्यानुसार देयके सादर



(शा.म.मु.) एचबी १९३५-८ (१,०००-११-२००९)

करण्याच्या विद्यमान पद्धतीत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

उपरोक्त प्रस्तावनेत उल्लेखिलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन, शासन आता असे आदेश देत आहे की, माजी विधानमंडळ सदस्यांना उपरोक्त दिनांक २७ डिसेंबर २००७ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेली आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची पद्धत रद्द करण्यात येत असून, यापूर्वी दिनांक ८ जून २००० च्या आदेशान्वये लागू असलेली कार्यपद्धती दिनांक १ एप्रिल २००९पासून पुन्हा अंमलात आणण्यात येत आहे. त्यानुसार माजी सदस्यांच्या रेल्वे प्रवास सवलतीच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्यासाठी माजी सदस्य सध्या ज्या ठिकाणी त्यांचे **निवृत्तीवेतन** घेत असतील, **त्या जिल्ह्याचे कोषागार अधिकारी अथवा त्या तालुक्याचे उप कोषागार अधिकारी यांना दिनांक १ एप्रिल, २००९पासून आहरण व संवितरण अधिकारी** (Drawing and Disbursing Officer) **म्हणून घोषित* करण्यात येत आहे. त्यासंदर्भात जिल्हा स्तरावर '' अप्पर कोषागार अधिकारी (सेवा निवृत्तीवेतन) '' हे देयक तयार करणारे '' व '' अप्पर कोषागार अधिकारी (लेखा परीक्षण)'' हे '' देयक पारीत करणारे अधिकारी '' राहतील. उप कोषागार कार्यालयात एकच अधिकारी असल्यामुळे, तेथे पूर्वीची पद्धत अंमलात राहील.आणि त्यानुसार, '' उप कोषागार अधिकारी '' हे आहरण व वितरण अधिकारी म्हणून राहतील.** त्यानुसार प्रस्तुत अधिकारी रेल्वे प्रवास सवलतीच्या प्रतिपूर्ती संदर्भात **आहरण व संवितरण अधिकारी म्हणून दिनांक १ एप्रिल २००९ पासून काम पाहतील. दिनांक ३१ मार्च २००९ पर्यंत विद्यमान '' उपविभागीय अधिकारी '' हेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कार्यरत राहतील. त्यानुसार १ एप्रिल, २००८ ते दिनांक ३१ मार्च २००९ या कालावधीमध्ये रेल्वे प्रवास खर्चाच्या देयकांची प्रतिपूर्ती संबंधीत तालुक्याच्या उप विभागीय अधिकारी यांचेकडून करण्यात यावी.**

**२.** प्रस्तुत सुविधेवर होणारा खर्च महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या **२०११-संसद/राज्य/संघराज्य क्षेत्र विधानमंडळ-०२ राज्य/संघराज्य/क्षेत्र विधानमंडळ-१०१ विधानसभा/१०२ विधानपरिषद** या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. माजी विधानमंडळ सदस्यांनी राज्यात व राज्याबाहेर रेल्वे ऐवजी विमानाने प्रवास केल्यास त्यांना अनुज्ञेय असलेल्या रेल्वे भाड्याच्या रकमेची प्रतिपूर्ती उप कोषागार/कोषागार अधिकारी यांनी करावयाची आहे.

४. दिनांक २७ डिसेंबर २००७ च्या शासन निर्णयातील अन्य तरतुदीमध्ये कोणताही बदल नाही.

५. हा शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक-९/०९/ई-८, दिनांक २० फेब्रुवारी २००९ आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-३०/९/कोषा-५, दिनांक ५ फेब्रुवारी २००९ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. अ. देशपांडे,**
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

महाराष्ट्र शासन

तात्काळ/विधानमंडळ बाब

क्रमांक सुविधा.२००९/सं.क्र. ४२१२/दोन,
**संसदीय कार्य विभाग**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ३१ जुलै २००९.

प्रति,

(१) सर्व जिल्हाधिकारी,

(२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

**विषय :---माजी विधानमंडळ सदस्यांना रेल्वे/विमान प्रवास खर्च प्रतिपूर्ती सुविधा.**

**संदर्भ.---संसदीय कार्य विभाग, शासन निर्णय**

(१) क्र. सुविधा.२००५ प्र.क्र. १३४ दोन, दिनांक २७ डिसेंबर २००७.

(२) क्र. सुविधा.२००८/प्र.क्र. १५/दोन, दिनांक ४ जुलै २००८.

(३) क्र. सुविधा.२००८ प्र.क्र. ४८/दोन, दिनांक २ मार्च २००९.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भाधीन अनुक्रमांक १ येथील शासन निर्णयाद्वारे माजी विधानमंडळ सदस्य त्यांचे निर्वत्ति वेतन घेत असतील त्या तालुक्याचे महसूल विभागाकडील संबंधित " उप विभागीय अधिकारी " यांना, माजी सदस्यांच्या रेल्वे प्रवासाच्या प्रतिपूर्तीच्या देयकासंदर्भात दिनांक १ एप्रिल २००८ पासून आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले. वरील अनुक्रमांक २ येथील शासन निर्णयानुसार, रेल्वे प्रवास सवलत प्रतिपूर्ती २५,००० कि. मी. वरून ३५,००० कि.मी. पर्यंत वाढविण्यात आली आहे. सदरहू पद्धतीमध्ये प्रतिपूर्तीची देयके मंजूर होण्यास अडचणी येत असल्यामुळे, तसेच त्यामध्ये कालापव्यय होत असल्यामुळे, पुन्हा पूर्वीची पद्धत चालू करण्याबाबत माजी विधानमंडळ सदस्यांनी शासनास तसेच विधानमंडळ सचिवालयास विनंती केली. त्यामुळे वरील क्रमांक ३ येथील शासन निर्णयानुसार, माजी सदस्य ज्या ठिकाणी निवृत्ति वेतन घेत असतील, त्या **जिल्ह्याचे कोषागार** अधिकारी अथवा **त्या तालुक्याचे उप कोषागार अधिकारी** यांना दिनांक १ एप्रिल २००९ पासून पुन्हा पूर्वीप्रमाणेच **" आहरण व संवितरण अधिकारी "** म्हणून घोषित करण्यात आले आहे.

२. वरील क्रमांक १ व ३ येथील दोन्ही शासन निर्णयातील तरतुदी स्वयंस्पष्ट आहेत. दिनांक १ एप्रिल २००८ ते दिनांक ३१ मार्च २००९ या कालावधीमध्ये माजी सदस्यांच्या रेल्वे प्रवासाच्या देयकासंदर्भात " उप विभागीय अधिकारी " हे आहरण व संवितरण अधिकारी असल्यामुळे, त्या कालावधीतील माजी सदस्यांच्या रेल्वे प्रवास देयकांची प्रतिपूर्ती उप विभागीय अधिकाऱ्यांच्या

कार्यालयाकडून त्वरेने होण्याची आवश्यकता आहे. त्यानंतर दिनांक १ एप्रिल २००९ पासूनच्या रेल्वे प्रवासाच्या कालावधीची देयके संबंधित जिल्हा कोषागार/उप कोषागार कार्यालयाकडून प्रतिपूर्ती होण्याची आवश्यकता आहे. तथापि, याबाबत कालापव्यय होत असून, देयके स्वीकारण्याबाबत शंका असल्याबाबतच्या तक्रारी काही माजी सदस्यांनी विधानमंडळ सचिवालयाकडे केल्याचे निदर्शनास आले आहे.

३. यास्तव उपरोक्त परिच्छेदातील वस्तुस्थिती लक्षात घेऊन, आपणास असे कळविण्यात येते की, वरील परिच्छेदात नमूद केलेल्या कालावधीतील माजी सदस्यांच्या रेल्वे प्रवासाच्या देयकाचे कृपया तत्परतेने प्रतिपूर्ती करण्यात यावी. तसेच जुनी देयके सादर करण्याबाबत विलंब झाला असल्यास त्याकरिता तीन महिन्यांचा विहित कालावधी प्रशासकीय कारणास्तव झालेला असल्याने क्षमापित करण्यात येत असून अशी देयके कृपया **त्वरीत** मंजूर करावीत. अशी देयके सादर करण्यास जर **बराच** विलंब झाला असेल, अशी देयके संसदीय कार्य विभागाकडे विलंब क्षमापित करण्यासाठी सादर करावी. तसेच इतर काही अडचणी असल्यास, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे परस्पर तक्रार न करता या विभागाकडे संदर्भ करावा.

४. सर्व जिल्हाधिकारी यांनी वरील सूचना त्यांच्या अधिपत्याखालील '' **सर्व उप विभागीय अधिकाऱ्यांच्या** '' निदर्शनास आणाव्यात तसेच, सर्व जिल्हा कोषागार अधिकारी यांनी वरील सूचना त्यांच्या अधिपत्याखालील '' **उप कोषागार अधिकाऱ्यांच्या** '' निदर्शनास आणाव्यात.

आपला,
**(क. य. वंजारे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

# माजी विधानमंडळ सदस्यांना त्याचे विवाहसाथी अथवा एका सहकाऱ्यासह महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या गाड्यांतून विनामूल्य प्रवास करण्याची सवलत

**माजी विधानमंडळ सदस्यांना त्यांचे विवाहसाथी अथवा एका सहकाऱ्यासह महाराष्ट्र राज्य मार्ग पहिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या गाड्यांतून विनामूल्य प्रवास करण्याची सवलत.**

महाराष्ट्र शासन

**गृह विभाग**

शासन निर्णय क्र. एसटीसी, १९००/प्र. क्र. १६७/परि-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ मार्च २००१

**शासन निर्णय**

गृह विभाग, शासन निर्णय, क्रमांक एसटीसी. १९९९/प्र.क्र. ८८/परि-१, दिनांक १४ जुलै २००० व शासन निर्णय क्रमांक एसटीसी. १९९९/प्र.क्र. ८८/परि-१, दिनांक २५ जुलै २००० अन्वये माजी विधान- मंडळ सदस्य व त्याचे विवाहसाथी अथवा एक सहकारी यांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या साध्या तसेच निमआराम (एशियाड) या बसेसमधून विनामूल्य प्रवास सवलत देण्यात आलेली आहे. हे दोन्ही आदेश या आदेशाद्वारे अधिक्रमित करण्यात येत असून या प्रकरणी पुढीलप्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहे :--

माजी विधानमंडळ सदस्य व त्यांचे विवाहसाथी अथवा एक सहकारी यांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेसमधून विनामूल्य प्रवास करण्याची सवलत देण्यात येत आहे. माजी विधानमंडळ सदस्यांना महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने पुरविलेल्या ओळखपत्राच्या आधारे ही प्रवासाची सवलत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने द्यावी. याबाबतच्या आवश्यक त्या सूचना त्यांच्या सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना ताबडतोब निर्गमित कराव्या व या योजनेची ताबडतोब अंमलबजावणी करावी.

२. या सवलतीमुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळावर पडणाऱ्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयकडून केली जाईल.

३. हा शासन निर्णय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय व वित्त विभाग यांच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर. २५/२००१/व्यय-८, दिनांक ६ जानेवारी २००१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
**य. टे. पाडवी,**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई